
## मध्य पूर्वेत युद्धसंघर्षामुळे जागतिक पातळीवर परिणाम



**नवी दिल्ली** : अमेरिका-इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने आता थेट युद्धाचे रूप धारण केले आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने केलेल्या भीषण हल्ल्यानंतर इराणनेही आक्रमक प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. या जागतिक तणावामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली असून याचा मोठा आणि थेट फटका विकसनशील अर्थव्यवस्थेला बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तज्ज्ञांच्या मते सध्याच्या घडामोडींमुळे मध्य-पूर्वेतील युद्धजन्य स्थिती तीव्र होऊ शकते. त्यामुळे विशेषतः जागतिक तेल बाजार, व्यापार मार्ग आणि राजनैतिक समिकरणांवर मोठा परिणाम होऊ शकतो. इंधनाचे दर वाढले की त्याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होतो. पेट्रोल आणि डिझेल महाग झाल्यास मालवाहतुकीचा खर्च वाढेल. परिणामी दैनंदिन गरजेच्या वस्तू, भाजीपाला, फळे आणि अन्नधान्य महाग होऊ शकते.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २२४
www.ramprahar.com

◆ सोमवार, २ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### अंतरंग

'बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न मार्गी लावणार'/२

स्वच्छतेद्वारे डॉ. नानासाहेब धर्माधिकारींना आदरांजली/५

पिंच्याक सिलॅट वूमन लीगमध्ये महाराष्ट्र चॅम्पियन/८

# गुरू तेग बहादुर यांचे कार्य प्रेरणादायी

## ■ केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे शहिदी समागमात उद्गार





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंद दी चादर म्हणून संपूर्ण देशात ओळखले जाणारे श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे शहिदत्व हे सर्व समाजासाठी आणि संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी आपले शीश अर्पण केले. देश त्यांच्या या त्यागात सदैव ऋणी आहे, असे उद्‌गार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि. १) खारघर येथे काढले.

अल्पसंख्याक विकास आणि राज्य सर्वसमागम विभाग यांच्या वतीने खारघर येथे गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त दोन दिवस विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास दुसऱ्या दिवशी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची उपस्थिती लाभली. त्यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समनव्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पनवेलचे महापौर नितीन पाटील आदी उपस्थित होते. आदी उपस्थित होते.

### लंगरसेवेद्वारे परंपरा जपली


केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी खारघर येथे आयोजित 'हिंद-दी-चादर' समागम कार्यक्रमादरम्यान स्वतः लंगरमध्ये संत-महंताना भोजन वाढून सेवा दिली. सेवा हीच खरी श्रद्धा या शीख परंपरेचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भोजन वाढून लंगरसेवा दिली.

या उपक्रमाचे महत्त्व विषद करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, प्रत्येक गुरूद्वारा आणि वस्तीपर्यंत 'हिंद दी चादर'चा संदेश पोहचविण्यासाठी बाबा हरनाम सिंगजी यांनी मोठे कार्य केले आहे. राज्य शासनाने यापूर्वी नांदेड व नागपूर येथे आयोजित केलेल्या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून नवी मुंबईतील कार्यक्रमात शीख बांधवांसह विविध समाजघटकांचा मोठा सहभाग असल्याचेही त्यांनी सांगितले.

गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहादतीचा विशेष उल्लेख करताना केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी सांगितले की, अन्याय आणि अत्याचारांविरोधात उभे राहून त्यांनी दिलेले शहिदत्व भारतीय इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी घटना आहे. शीश दिया, पर सिर न झुकाया हीच शीख गुरू परंपरेची ओळख असून भारताच्या अखंडतेचा तो आधार आहे.

यावेळी शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंग, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री शाह यांचा जफरनामा देऊन सत्कार करण्यात आला. (पान २ वर..)

### गुरूंचा त्याग आणि एकतेचा संदेश महत्त्वपूर्ण -पंतप्रधान नरेंद्र मोदी



**नवी दिल्ली** : महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमाच्या माध्यमातून आपण महान परंपरेचे साक्षीदार होत आहोत. गुरूंनी दिलेला त्याग आणि सामाजिक एकतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ध्वनिचित्रफितद्वारे दिला.

गुरूंनी त्यागाची पराकाष्ठा केली. त्या काळात समाजातील सर्व घटक एकत्र उभे राहिले. सत्य आणि संस्कृतीसाठी ठाम राहण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. या सामाजिक एकतेच्या महायज्ञात गुरू गोविंद सिंह आणि गुरू नानक नाम लेवा संगत यांची महत्त्वाची भूमिका होती. आज देशाला पुन्हा सामाजिक एकतेची गरज असताना हा समागम आश्वासक ठरत असल्याचे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

या यात्रेची सुरुवात गेल्या वर्षी नागपूर येथून झाली. त्यानंतर नांदेडमधील तख्त हजूर साहिब येथे कार्यक्रम झाला आणि आता नवी मुंबईत हा समागम महत्त्वाच्या टप्प्यावर पोहचला. या उपक्रमाद्वारे गुरू तेग बहादूर यांचा शौर्यपूर्ण इतिहास महाराष्ट्रातील हजारो गावांपर्यंत पोहचविण्यात आल्याबद्दल पंतप्रधानांनी शासनाचे अभिनंदन केले.

## इस्त्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी ठार



**तेहरान : वृत्तसंस्था**

इस्त्रायलने अमेरिकेच्या मदतीने केलेल्या भीषण हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. इस्त्रायल डिफेन्स फोर्सेसने याचा व्हिडीओ जारी केला असून त्यामध्ये खामेनींचे मुख्यालय पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन ढिगाऱ्यात रूपांतरित झाल्याचे दिसत आहे.

या संयुक्त कारवाईत अयातुल्ला खामेनी यांच्यासह त्यांचा मुलगा, मुलगी, नात, सून आणि जावई यांचाही मृत्यू झाल्याचा दावा काही माध्यमांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांना खामेनी यांच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठका सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे इस्त्रायलने खामेनींच्या मुख्यालयावर सुमारे ३० बॉम्ब टाकले, ज्यात खामेनी यांच्यासह तिथे उपस्थित सर्वजण ठार झाले.

दरम्यान, खामेनी यांच्या मृत्यूनंतर काही तासांतच अनुभवी धर्मगुरू आणि खामेनी यांचे जवळचे सहकारी अयातुल्ला अलीरेजा अराफी यांना तात्पुरते इराणचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे.

## आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अत्यावश्यक सूचना जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

इराण-इस्त्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर मध्य-पूर्व व आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा विचार करून परदेशात वास्तव्यास असलेल्या व अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सूचना जारी केल्या असल्याची माहिती राज्य आत्पकालीन कार्य केंद्राकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार खात्याने तसेच विविध भारतीय दूतावासांनी २४x७ आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित केले असून राज्य शासन या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळण्याचे तसेच दूतावासाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना व मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

परदेशात अडकलेल्या नागरिकांबाबत माहिती देण्यासाठी अथवा आपत्कालीन मदतीसाठी राज्य आत्पकालीन कार्य केंद्र (एसईओसी) २४x७ सुरू राहणार आहे. नागरिकांनी फोन १०७७ (टोल फ्री) फोन +९१-९३२१५८७१४३ दूरध्वनी ०२२-२२०२७९९० ई-मेल controlroomgov.in यावर संपर्क साधावा.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी वितरण




### नवीन पनवेलमधील पिल्लई युनिव्हर्सिटीत समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या विद्यार्थ्यांचा पदवी वितरण समारंभ केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते शनिवारी (दि. २८) नवीन पनवेल येथे झाला. यावेळी त्यांनी आगामी राष्ट्रीय पायाभूत सुविधा आणि विकास कॉरिडॉरमध्ये पनवेल हे एक महत्त्वाचे केंद्र असल्याचे अधोरेखित केले.

या समारंभाला आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, जीईएमएस एज्युकेशन इंडियाचे सीईओ फ्रान्सिस जोसेफ, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ.के.एम. वासुदेवन पिल्लई, सचिव डॉ. डॅफ्ने पिल्लई, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियम पिल्लई, (पान २ वर..)

## मुंबई ते विजयदुर्ग रो-रो सेवा सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील भाऊचा धक्का ते कोकणातील विजयदुर्गदरम्यान बहुप्रतिक्षित रो-रो जलवाहतूक सेवा रविवार (दि.१)पासून अधिकृतपणे सुरू झाली. मत्सव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी या सेवेला झेंडा दाखवून पहिली फेरी रवाना करण्यात आली.

या सेवेमुळे रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होणार असून कोकणवासीयांना आणि पर्यटकांना जलवाहतुकीचा एक जलद आणि सुखद पर्याय उपलब्ध झाला आहे.

### नागपूरमध्ये कारखान्यात भीषण स्फोट

## १७ कामगारांचा मृत्यू; १८ गंभीर जखमी

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्याच्या काटोल तालुक्यातील राऊळगावजवळील कारखान्यात रविवारी (दि. १) सकाळी भीषण स्फोट होऊन १७ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत १८ जण जखमी झाले असून त्यांना नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

राऊळगावजवळील एवनीरा परिसरात एसबीएल एनर्जी लि. या दारूगोळा बनवणाऱ्या डिटोनेटर कंपनीत रविवारी सकाळी ७च्या सुमारास भीषण साखळी स्फोट झाले. यात १७ कामगारांच्या देहाच्या चिंधड्या उडाल्या. मृतांमध्ये १४ महिलांसह तीन पुरुष कामगारांचा समावेश आहे. याशिवाय आणखी १८ कामगार भीषण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त करीत मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना दोन लाख रुपये सानुग्रह मदत तसेच जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून केली आहे, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना राज्य सरकारतर्फे पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

### राम प्रहर

### मंगळवारचा अंक नाही

होळी सणानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास सोमवारी सुटी असल्यामुळे मंगळवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

होळीच्या सर्वांना शुभेच्छा!

-मुख्य संपादक

### निवडक

#### पाकिस्तानमध्ये गोळीबारात १० आंदोलकांचा मृत्यू

**कराची** : अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते आयतौल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. यानंतर पाकिस्तानमधील आंदोलकांनी रविवारी (दि. १) अमेरिकन दूतावासावर हल्ल्याचा प्रयत्न केला. यावेळी सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात १० आंदोलकांचा मृत्यू झाला असून ३०हून अधिक जखमी झाले आहेत.

#### कचऱ्याच्या आगीतून विषारी धूर; पाच विद्यार्थी रुग्णालयात

**पुणे** : लोणी काळभोर परिसरात मुळा-मुठा नदीपात्राजवळ जाळलेल्या कचऱ्यामुळे विषारी धूर पसरला. त्यामुळे एमआयटी शैक्षणिक संकुलात शिकणाऱ्या पाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## कोकणात शिमगोत्सवाची रंगत

### लोककलांचा जागर

**माणगाव : प्रतिनिधी**

होळीचा सण एक दिवसावर आल्याने कोकणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिमगोत्सवानिमित्त गावोगावी लोककला सादर करणारे कलाकार फिरू लागल्याचे चित्र आहे.



मनोरंजनासोबतच संस्कृतीचे जतन व संवर्धन करणाऱ्या या लोककलेतून समाजजागृतीचा संदेश दिला जात आहेत.

रायगड जिल्ह्यासह कोकणात शिमगोत्सवाला विशेष महत्त्व आहे. ठिकठिकाणी ग्रामदैवतांच्या पालख्या, पारंपरिक नृत्यप्रकार व इतर कार्यक्रमांची तयारी पूर्ण झाली आहे. कोकणातील शिमगोत्सव हा केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक एकात्मतेचा सोहळा मानला जातो. तरुणाईत विशेष उत्साह दिसून येत असून पारंपरिक वेशभूषा, मुखवटे आणि रंगोत्सवासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी वाढली आहे.

लोककलांमध्ये समूहनृत्य, पारंपरिक गाणी, विनोदी व सामाजिक आशयाच्या सादरीकरणांमुळे ग्रामस्थ मंत्रमुग्ध होत आहेत. लहानांपासून थोरांपर्यंत तसेच महिलांचा उत्स्फूर्त सहभाग या उत्सवाचे वैशिष्ट्य ठरत आहे. या खेळांमध्ये पारंपरिक वाद्यांचा सुरेल संगम अनुभवायला मिळतो. विशेष म्हणजे मुंबईकर चाकरमानीही आपल्या गावाकडे परत येऊन या लोककलेत सहभागी होत आहेत. त्यामुळे गाव आणि शहर यांतील भावबंध अधिक दृढ होत आहेत.

शिमगोत्सवाच्या निमित्ताने एकोप्याचा संदेश देत संस्कृतीची परंपरा पुढील पिढीकडे सुपूर्द करण्याचे कार्य या लोककलेतून होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. विविध प्रकारच्या वेशभूषा राधाकृष्ण, गौळणी, डेरे वाद्य वाजवणारे, स्त्री वेशभूषा परिधान केलेले कलाकार या कलेचे सादरीकरण करत आहेत. मनोरंजनासोबतच विचारांची देवाणघेवाण आणि सामाजिक भान जागवणारा हा शिमगोत्सव कोकणच्या सांस्कृतिक वैभवाची जिवंत परंपरा अधोरेखित करीत आहे.



# बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न मार्गी लावणार -आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

बाळगंगा धरणाचे काम गेली १६ वर्षापासून सुरू असून या धरणाचे काम जवळपास ८० टक्के पूर्ण झाले असून अनेक वर्ष सुरु असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने विविध प्रलंबित मागण्यांसाठी तसेच कोरा झालेला सातबारा मूळ मालकांच्या नावे परत मिळावा या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार (दि.२७)पासुन प्रांत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसले आहे रविवारी उपोषणाला तिसरा दिवस असून आमदार रविशेठ पाटील यांनी उपोषण कर्त्यासोबत सविस्तर चर्चा केली आणि या प्रश्नाबाबत मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजिन करून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



राजिप भाजप गटनेते यांनी बोलताना सांगितले की, बालगंगा प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित असून जागेचे, फळझाडे, याचे मूल्याकन प्रलंबित आहेत गेली अनेक प्रश्न प्रलंबित असलेला बालगंगा प्रकल्प ग्रस्ताचे अजून पर्यत सुटले नाही, पेणमध्ये होउ घातलेला ग्रोथ प्रकल्पामुळे जमिनीच्या किमती वाढल्या आहेत, परंतु १६ वर्ष पुर्वी बालगंगा धरणासाठी अधिग्रहण केलेल्या जमिनी अल्प दरात शासनाने घेतल्या आहेत. काही जमिनीचे मूल्याकन झाले नाही, परंतु सातबारा उतारा वर शिका पडल्याने विकतासुद्धा येत नाही आणि विशेष येथील शेतकऱ्यांना कोणत्याच योजनेचा लाभ मिळत नाही ही प्रकल्पग्रताची फसवणूक झाल्यासारखी आहे आता बालगंगा प्रकल्प ग्रस्तना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत ठाम पाठिशी राहणार असल्याचे उपोषणस्थळी सांगितले.

या उपोषणाला तिसऱ्या दिवशी पेणचे आमदार रविशेठ पाटील, जिल्हा परिषद भाजप गटनेते वैकुंठ पाटील, शिवसेना नेते प्रसाद भोईर, माजी नगरसेवक शोमेर पेणकर, माजी शिवसेना तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, शिवसेना युवा अध्यक्ष चेतन मोकळं, योगेश पाटील, यांनी उपोषण स्थळी भेट दिली आहे.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे रविवारी (दि.१) स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानमार्फत संपूर्ण महाराष्ट्र,राज्यांमध्ये यशस्वीरीत्या स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी ३७.५ टन कचरा गोळा करण्यात आला. अभियानामध्ये २४७६ सदस्य सहभागी होते.




डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडामार्फत सातत्याने सामाजउपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने वृक्ष लागवड आणि संवर्धन, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबिर, दाखले वाटप, शैक्षणीक साहित्य वाटप, अंध व मुखबधीर विद्यार्थांना मदत. उद्योजकता व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीर, जनजागृती शिबीर, पाणपोई, आपतग्रस्तंना मदत यासारखे अनेक उपक्रम राबविले जातात. गेल्या काही वर्षापासून प्रतिष्ठानमार्फत स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच्या या महान कार्याची पंतप्रधान नरेंद मोदी यांनी दखल घेत त्यांनी जेष्ठ निरुपणकार डॉ. आप्पासाहेब तथा दत्तात्रेय धर्माधिकारी यांची स्वच्छतादूत म्हणून निवड केली आहे.

१ मार्च रोजी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडामार्फत राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात ३२.३० किलोमीटर लांब रस्ते, तसेच १६७८७.०६ चौरस मीटर सरकारी कार्यालये, रुग्णालये व इतर परिसर व पाच किलोमीटर समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता अभियानात २,४७६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. ३७.५ टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला. जमा केलेला कचरा डंपिंग ग्राऊंडपर्यंत नेण्यात आला.

# कर्जत-कल्याण राज्यमार्गावर अपघातात तरुणाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत–कल्याण राज्यमार्गावर नेरळ पोलीस ठाण्याजवळ असलेल्या पुलावर एक भीषण अपघात घडला आहे. या अपघातात नेरळ येथील मोहाची वाडी येथील रहिवासी चंद्रकांत ऐनकर वय वर्ष ४५ याचा जागीच मृत्यू झाला. होळीसारख्या उत्साहाच्या सणादरम्यान ही दुर्घटना घडल्याने संपूर्ण नेरळ परिसरात शोककळा पसरली आहे.



अपघात घटनास्थळी मिळालेल्या माहितीनुसार चंद्रकांत ऐनकर हे आपल्या दुचाकीवरून नेरळ बाजारपेठेत काही वस्तूंच्या खरेदीसाठी गेले होते. बाजारातील काम आटोपून ते पुन्हा आपल्या घराकडे परतत असताना नेरळ पोलीस ठाण्या जवळील पुलावर त्यांची दुचाकी पुलाला धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, चालक ऐनकर पुलावरून खाली कोसळले. या गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच नेरळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी रुग्णवाहिका बोलावून ऐनकर यांना तात्काळ उपचारासाठी रायगड हॉस्पिटल येथे हलवले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# मोरबे प्रकल्पग्रस्त जनतेच्या समस्या सोडवू –माधव भंडारी

**चौक : प्रतिनिधी**

३५ वर्ष मोरबे धरणामुळे बाधित झालेल्या मोरबे प्रकल्पग्रस्त जनतेचे प्रश्न संघर्ष न करता सरकारशी संवाद साधून सोडविण्यात येतील, जनजागरण प्रतिष्ठान यांनी आजपर्यंत जे जे काम हाती घेतले ते संवाद साधून सोडविले आहेत, असे प्रतिपादन जनजागरण प्रतिष्ठानचे संस्थापक आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी केले.



रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण आणि नवी मुंबई महानगर पालिका व पनवेल महानगर पालिकेच्या खारघर, कामोठे विभागाला पाणी पुरवठा करणारे मोरबे धरण खालापूर तालुक्यातील आठ महसुली गावे आणि आठ आदिवासी वाड्या यांना स्थलांतरित करून मोरबे धरण बांधण्यात आले आहे. आज ३६ वर्ष झाली तरीही योग्य पुनर्वसन आणि इतर मागण्या पूर्ण न झाल्याने मोरबे धरण कृती समिती यांनी जनजागरण प्रतिष्ठान यांच्या नेतृत्वाखाली राज्य समन्वयक देवराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लढा उभा केला आहे. आज मोरबे प्रकल्पग्रस्त यांच्याशी संवाद साधण्यासाठी माधव भंडारी उपस्थित होते.

प्रकल्पग्रस्त यांना मार्गदर्शन करताना मोरबे धरणाच्या भूसंपादन ते धरण पूर्ण होईपर्यंत चा इतिहास ऐकला, संघर्ष करून आपले आणि आपल्या पिढीचे नुकसान न करता सरकारशी संवाद साधून तुमचा प्रश्न येत्या काळात सुटेल असे आश्वासन देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नेहमी प्रकल्पग्रस्त जनतेच्या बाजूने उभे असतात, त्यामुळे हाही प्रश्न लवकर निकाली निघेल, असे खात्रीपूर्वक सांगितले. राज्य समन्वयक देवराज देशमुख यांनी प्रकल्पग्रस्त यांनी साथ द्यावी असे आवाहन करून लवकरच संबंधित यंत्रणे बरोबर बैठक होईल असे सांगितले.

यावेळी जनजागरण प्रतिष्ठानचे राज्य कार्यकारिणी, कृती समितीचे समिती अध्यक्ष जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष परशुराम मुरकुटे, रायगड अध्यक्ष सतीश जाधव, प्रफुल्ल विचारे, मिलिंद राणे, योगेश प्रबळकर, राजू पाटील, अंकुश वाघ यांच्यासह मोरबे धरण प्रकल्पग्रस्त महिला, पुरुष,बाळगंगा प्रकल्पग्रस्त, रायगड जिल्ह्यातील कोयना आणि इतर काही प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेण शहरात १५ टन कचरा केला गोळा

**पेण : प्रतिनिधी**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सदस्य स्वच्छता मोहीम राबिवताना श्रमदानातून समाज घडविण्याचे कार्य करीत आहेत, असे प्रतिपादन नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी स्वच्छता मोहीमवेळी केले.

थोर समाजसुधारक डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त पेण तालुक्यातील श्री सदस्यांनी रविवारी शहरात स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये १५ टन कचरा गोळा करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण तालुक्यातील १५ बैठकांतील श्री सदस्य सामील झाले होते. या स्वच्छता मोहीमेत उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, नगरसेविका पल्लवी कालेकर, नगरसेविका कलावती पाटील, नगरसेवक अभिराज कडू, नगरसेविका जस्विन पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर, मितेश शहा, मा. उपनगराध्यक्ष वैशाली कडू, नगरसेवक प्रविण पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य निरीक्षक दयानंद गावंड आदींसह श्री सदस्यांनी सहभाग घेतला.



यावेळी पेण, दादर, वरवणे, सापोली, हनुमान पाडा, वरसई, धावटे, वाशी, रावे, वडखळ, आंबिवली, भाल, वाशीनाका, जिते, शिर्की, या बैठकांतील श्री सदस्यांनी शहरात स्वच्छता अभियान राबविले. यामध्ये पेण शहरातील तहसिल कार्यालय, प्रांताधिकारी कार्यालय, पोलीस स्टेशन, पेण फौजदारी व दिवाणी न्यायालय, पेण बस स्थानक, रायगड बाजार परिसर अशा शहरातील अंतर्गत २१ कि. मी चे रस्ते ठिकाणी स्वच्छता करुन ४. ३५५ टन ओला व ११.२०० टन सुका कचरा गोळा केला. हा कचरा शहारा बाहेरील डम्पिंग ग्राउंड येथे नेऊन जमा केला.

# खालापूर पंचायत समितीचा सभापती महायुतीचाच होणार –सुधीर ठोंबरे

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीपदाची निवडणूक खालापूर पंचायत समिती कार्यालयात ११ मार्च रोजी होणार आहे. खालापूर पंचायत समितीवर महायुतीचा झेंडा फडकला असला तरी सभापती व उपसभापतीपद कुणाला द्यायचे हे महायुतीत ठरले नसल्याने भारतीय जनता पक्ष शब्द पाळेल का ही चर्चा निरर्थक आहे, असे भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी स्पष्ट केले.

येत्या ११ मार्च रोजी सभापती व उपसभापतीपदाची निवडणूक होत आहे. एकूण आठ सदस्यांमधून तीन भाजप, दोन शिवसेना, दोन शिवसेना उबाठा तर, एक राष्ट्रवादी अजित गट असे संख्याबळ आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक खालापूर तालुक्यात शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष युतीत एकत्र लढले होते.

२०१७नंतर पंचायत समितीची सत्ता पुन्हा महायुतीकडे आली. भाजपला सर्वाधिक आठपैकी तीन जागा मिळाल्या असून शिंदे शिवसेनेला दोन जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे बहुमत युतीकडे आहे. सभापतीपद हे सर्वसाधारण असल्याने चुरस आहे, आमदार महेश बालदी यांचे निकटवर्ती आणि ग्रुप ग्रामपंचायत वासांबे माजी सरपंच कृष्णा पारंगे आणि आमदार महेंद्र थोरवे यांचे निकटवर्ती आणि रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष भाई शिंदे हे प्रमुख दावेदार आहेत.

अडीच अडीच वर्षाचा फॉर्म्युलादेखील ठरला नाही, कोणतीच चर्चा नाही, वरिष्ठ निर्णय घेतील आणि महायुतीचा सभापती विराजमान होणार एवढे नक्की, असे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी नमूद केले.

पान १ वरुन

## गुरू तेग बहादुर यांचे कार्य प्रेरणादायी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंद दी चादर गुरू तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेली शहादत ही जगाच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. त्यांच्या बलिदानाची गाथा केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती पुढील पिढीपर्यंत पोहचली जावी. यासाठी शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश केला जाणार आहे तसेच नवी मुंबई परिसरात त्यांच्या नावाने रुग्णालय उभारण्यात येईल, अशी माहिती दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मानवतेचे रक्षक आणि महान त्यागी गुरू तेग बहादुर साहीबजी यांचा त्याग मानवतेच्या इतिहासातील गौरवपूर्ण पर्व आहे. त्यांचे बलिदान हे केवळ इतिहास नाही, तर ते संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान आहे. संस्कृती, परंपरेच रक्षण करण्यासाठी गुरूंनी प्राणांची आहुती दिली. त्यांचे कार्य अतूट श्रद्धा आणि अतूट धैर्याचे उदाहरण आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरू तेग बहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या काळातही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले. इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले.

## केंद्रीय मंत्री गडकरींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी वितरण

उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रणव पिल्लई, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. निवेदिता श्रेयांस, संचालक डॉ. प्रज्ञेश शाह, नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, सुमित झुंझारराव, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, जिल्हा परिषद सदस्य मंगेश वाकडीकर, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्यासह इतर मान्यवर, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबईतील पहिले खासगी विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या पिल्लई युनिव्हर्सिटीतर्फे पदवीधर विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी हा भव्य सोहळा असल्याचे यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले. त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली, ज्यामुळे पदवीधर बॅच आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी हा क्षण अधिक संस्मरणीय आणि प्रेरणादायी बनला.

# शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन



**उरण : बातमीदार**

उरण विधानसभा मतदार संघातील विविध समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी उरण विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले असून उरण विधानसभा मतदार संघातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहू, जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध राहू, असे आश्वासन श्रीरंग आप्पा बारणे यांनी दिले.

शिवसेनेच्या उरण विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन श्रीराजनगर कॉम्प्लेक्स, उरण कामठा रोड, गाडे हॉस्पिटलच्या शेजारी येथे रविवार, १ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले. यावेळी जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करून खासदार श्रीरंग बारणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी नगरसेवक रामदास शेवाळे, रायगड जिल्हा प्रमुख विनोद साबळे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष समद भोंगले, प्रीतम सुर्वे, मनोहर ठाकूर, मेघाताई दमडे, महेंद्र पाटील, वैजयंती ठाकूर, दिपक ठाकूर, रुबीना कुटी, सुनिल भोईर, अक्षय म्हात्रे, वीरू चाळके, संदेश म्हात्रे, गणेश म्हात्रे, दिनेश पाटील आदी उपस्थित होते. यावेळी विविध पक्षातील शेकडो पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना अवॉर्ड

**मुंबई :** महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांचा शुक्रवारी (दि.२७) आयोजित यंदाच्या नॅशनल लिडरशिप परिषदेमध्ये 'इंडियाज बिझीनेस लिडर ऑफ एक्सलेन्स अवॉर्ड–२०२६' या पुरस्काराने गौरव करण्यात आला. मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये टाइम्स एस्पायर या संस्थेच्या वतीने नॅशनल लिडरशिप शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकेश चंद्र यांना जाहीर झालेला पुरस्कार त्यांच्यावतीने सचिन तालेवार, मंगेश कोहाट यांनी स्वीकारला.



# कोकणातील शिमगा सणाला सुरुवात

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

कोकणात शिमगोत्सवाला (होळी) फाक पंचमीला सुरुवात होते. तेरसे आणि भद्रेसारख्या अनेक गावांमध्ये होळीच्या परंपरेनुसार शिमग्याला प्रारंभ होतो. रत्नागिरी, संगमेश्वर पट्ट्यात तेरसे मुहूर्तावर होळीचे होम लावले जातात.



कोकणात शिमगोत्सवाचे पडगम आजपासून सुरू झाले असून आज पहिले तेरसे शिमगे पार पडले म्हणजे तेरसे होळीचे होम उत्साह व जल्लोष पूर्ण वातावरणात पार पडले असून उद्या शिमगोत्सवावर ग्रहणाचे सावट पडले असून पुढील भद्रे व पौर्णिमेचे शिंगे एक दिवस पुढे गेले असून त्यांचे होलिकोत्सवातील होम ३ तारखेपासून पाठोपाठ होम लागणार आहेत.


या ग्रहणामुळे चाकरमान्यांना आपला शिमगोत्सवाचा कार्यक्रम बदलावा लागला.

कोकणातील शिमगोत्सव १४ फेब्रुवारीपासून प्रत्यक्षात सुरू झाला असून गेल्या शनिवारी २१ तारखेला फाक पंचमी सुरू झाली तर रविवार सकाळपासून खेळे बाहेर पडले ते सोमवारी व नंतर मंगळवारी देवाचे हे खेळे पार पडले, शनिवारी २८ तारखेला शिमगोत्सवातील गोड्या सणाला सुरुवात होऊन शनिवारी पालखीमध्ये देव मंदिरातून विराजमान झाले व त्या रात्रीपासून प्रथम शिमगोत्सवातील माड आणले गेले व पहाटेपर्यंत समस्त चाकरमानी व ग्रामस्थ व मानकऱ्यांच्या सहभागाने ढोल ताशांच्या गजरात फाका घालत माड उभे राहिले. त्या पैकी पहिले तेरस आज दुपारी १ वाजता शिमगोत्सवाचे होम गावो गाव लागले होळ्या पेटवण्यात आल्या.

## दुखवटा

### बंडू शिर्के

**पाली :** सुधागड तालुक्यातील फोटोग्राफर निलेश शिर्के यांचे वडील व पुई–सिद्धेश्वर येथील शेतकरी बंडू देवजी शिर्के (वय ७०) यांचे शनिवारी (दि.२१) निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई व चार नातवंडे असा आप्तपरिवार आहे. कै. बंडू शिर्के यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि.२) उद्धर रामेश्वर येथे होणार आहे. तसेच उत्तरकार्य गुरुवारी (दि.५) पुई सिद्धेश्वर येथे राहत्या घरी होणार आहे.



# लाखोंची फसवणूक करणारा आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील करंजाडे येथील रामचंद्र मालुसरे यांच्या निमिशा फोटो शॉपमध्ये जाऊन त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून विविध प्रकारचे कॅमेरे व इतर वस्तू भाड्याने घेऊन त्यानंतर पसार होऊन मोबाईल बंद करून राहू असलेल्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी अखेरीस तांत्रिक तपासाच्या आधारे शोध काढून त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.



आरोपी संजय पांडुरंग कदम याने तो स्वतः वापरित असलेले मोबाईल नंबर बंद करून तीन राज्यातील राहण्याचे पत्ते बदलुन परागंदा झाला होता. यामुळे या आरोपींचा शोध लागणे कठीण होते, मात्र या आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस करण्याबाबत पोलीस उपायुक्त, परिमंडळ – ३, प्रशांत मोहिते, सहायक पोलीस आयुक्त पनवेल विभाग, भाउसाहेब ढोले, वपोनि नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांनी आरोपीने वापरलेल्या मोबाईल नंबरचे तांत्रिक माहिती व विश्लेषणाच्या आधारे हा आरोपी दमण येथे राहत असलेबाबत माहिती समजताच ठिकाणी सपोनि सचिन पोवार, पोशि/विदयाधर गायकवाड, पोशि काशिनाथ लोखंडे अशा पथकाने दमण येथे जाऊन स्थानिक पोलिसांचे मदतीने आरोपी संजय पांडुरंग कदम याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली असुन गुन्हयाचे तपासकामी त्याचे राहते घराची झडती घेतली असता गुन्हयातील फसवणुक करून अपहार केलेल्या फोटोग्राफीच्या साहित्यापैकी काही साहित्य जप्त केले होते.

या आरोपीस मा.न्यायालयाने पाच दिवस पोलीस कोठडी मंजुर केली आहे. त्यानंतर आरोपीकडे तपास केला असता त्याने गुन्हयातील अपहार केलेला कॅमेरा व इतर साहित्य हे सीएसटी, मुंबई येथील एका कॅमेरा दुकानात विकल्याचे सांगितले. त्यांचेकडुन कॅमेरा व इतर साहित्य जप्त करण्यात आलेले असुन गुन्हयातील मालाची १०० टक्के रिकव्हरी करण्यात यश मिळविले आहे.

## बेलापूर–पेंधर मेट्रोसंदर्भात आवाहन

**पनवेल :** सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर वरील मेट्रो सेवा मंगळवार, ३ मार्च २०२६ रोजी होळी (धूलिवंदन) निमित्त सकाळच्या वेळेत बंद राहणार असून दुपारी २ पासून मेट्रो सेवा पुन्हा सुरू होणार आहे. या दिवशी दुपारी २ ते रात्री १० या वेळेत मेट्रो सेवा दर १५ मिनिटांनी उपलब्ध असणार आहे. तरी या मार्गावरील प्रवाशांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे आपल्या प्रवासाचे नियोजन करून सिडकोस सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोने केले आहे.

## कोन येथे स्कूटी ट्रेलरला धडकून दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील जुना मुंबई पुणे हायवे, पनवेल लेनवर कोन बिट पोलीस चौकी समोरून जाणाऱ्या ट्रेलरला समोरून उजव्या बाजूने स्वतःहून जाऊन स्कूटी चालकाने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात स्कूटीवरील दोन जणांचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे.

असद मेमन शमशद (वय १९, व्यवसाय रा. सिवुडस) हा त्याच्या ताब्यातील स्कूटी गाडी घेऊन त्याची मैत्रीण मुस्कान संजय सिंग (वय २०, रा.नेरूळ) हिला घेऊन पनवेलजवळील जुना मुंबई–पुणे हायवे, पनवेल लेनवर कोन बिट पोलीस चौकी समोरून जाणाऱ्या ट्रेलरला समोरून उजव्या बाजूने स्वतःहून जाऊन स्कूटीचालकाने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल–नवी मुंबई पत्रकार संघातर्फे गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल–नवी मुंबई पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल येथे २१ गरीब आणि गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. पनवेल नवी मुंबई–पत्रकार संघाचे अध्यक्ष मयुर तांबडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपक्रम राबविण्यात आला.




यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक प्रथमेश सोमण, भाजपचे सहसंयोजक–सांस्कृतिक सेलचे सुनील सिन्हा, प्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, पंडित मोहन जोशी, नगरसेवक सुमित झुंजारराव, भावना ग्रुपच्या अपर्णा शहा, सामाजिक कार्यकर्ते योगेश तांबोळी, हर्षला तांबोळी, डॉ. लक्ष्मीकांत निकम, शाहिद भाई आदी उपस्थित होते.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी, अध्यक्ष मयूर तांबडे याना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत मयुर तांबडे यांनी आपल्या परीने समाजाला काहीतरी देण्याचा नवा धडा आपल्या सहकाऱ्यांना दिला आहे. पत्रकार हा समाजाचा आरसा असतो, समाजाने प्रगती केली पाहिजे ही प्रत्येकाची इच्छा आहे. समाजावर होणाऱ्या अन्याया विरोधात आवाज उठवण्यासाठी पत्रकाराची भूमिका महत्त्वाची असते. पनवेल–नवी मुंबई पत्रकार संघातर्फे करण्यात येणारी समाजसेवा मयूर तांबडे हे सर्वांना सोबत घेऊन करत आहेत ते सर्वांसाठी अनुकरणीय असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

या वेळी उपाध्यक्ष दिपक कांबळे, सचिव लालचंद यादव, खजिनदार मिलिंद खारपाटील, सदस्य रमेश भोळे, अशोक गोरडे, दीपक जगे, समीर वेश्विकर, पंकज तांबडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अनेक पत्रकार उपस्थित होते. यावेळी कवी अशोक घरत यांनी कवितेचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहोकर यांनी केले.

# नगरसेवक बबन मुकादम यांचा कळंबोलीत जनता दरबार

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील प्रभाग क्र.८ मधील कार्यसम्राट नगरसेवक बबन मुकादम यांनी ससून सभागृहामध्ये रविवारी सकाळी ११ वाजता जनता दरबाराचे आयोजन केले होते. या जनता दरबाराला विविध सोसायट्यांचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्रभागातील महिलावर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



यावेळी उपस्थित नागरिकांनी अनेक नागरी समस्यांबाबत परखड मते मांडून त्या सोडवण्यास प्राधान्य देण्याची मागणी केली. त्यानुसार पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकाधिक चांगल्या नागरी सुविधा देण्यासाठी निश्चितच आगामी काळात महापालिकेच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे ठोस आश्वासन यावेळी नगरसेवक बबन मुकादम यांनी उपस्थित यांना दिले.

कळंबोलीतील नगरसेवक बबन मुकादम यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन केले. यावेळी प्रभागातील मान्यवरांनी प्रभागातून दुसऱ्यांदा बहुमताने निवडून येणारे नगरसेवकांचा यथोचित नागरी सत्कार करण्यात आला. उपस्थित नागरिकांच्या समस्या लेखी व तोंडी स्वरूपात जाणून घेऊन त्या सर्व नोंदवून घेण्यात आल्या. या समस्यांचे निराकरण महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातूनही त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे नगरसेवक बबन मुकादम यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित असलेल्या महिलांसाठी चारचाकी वाहन चालविण्याच्या प्रशिक्षणासाठी अर्जांचे वाटप करण्यात आले. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीमार्फत ही योजना राबविण्यात येणार असून, पात्र महिलांनी अर्ज भरल्यानंतर त्यांचे प्रशिक्षण कळंबोली येथेच दिले जाईल, असे आश्वासन देण्यात आले. तसेच MBBS किंवा BHMS शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. संबंधित अर्ज महानगरपालिकेत जमा करून विद्यार्थिनींना अनुदान मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे यावेळी सांगण्यात आले.

प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, गटार, सिव्हरेज लाईन, तसेच रस्त्यावरील दिवे आदी अनेक प्रश्न नागरिकांनी मांडले. या सर्व समस्यांचे शक्य तितक्या लवकर निराकरण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असे नगरसेवक बबन मुकादम यांनी स्पष्ट केले.

> **प्रभाग आठ हा स्वच्छ, सुंदर आणि परिपूर्ण नागरी सुविधांचा होण्यासाठी कार्यसम्राट आमदार आणि आमचे मार्गदर्शक प्रशांत ठाकूर यांच्या प्रेरणेने काम करू. प्रभागामध्ये अधिकाधिक चांगल्या सोयीसुविधा नागरिकांच्या सेवेस उपलब्ध करून देण्याचा निश्चितच आगामी काळात प्रयत्न राहणार आहे.**
> **–बबन मुकादम,** नगरसेवक

महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे आणि सभागृह नेते यांना लेखी स्वरूपात प्रश्न सादर केले जातील. तरीही प्रश्न सुटले नाहीत, तर आपले लाडके आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून ते शंभर टक्के सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ठोस आश्वासन यावेळी नगरसेवक बबन मुकादम यांनी दिले.

# सीकेटी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रशांत मोरे (प्राचार्य, उच्च माध्यमिक विभाग), संतोष चव्हाण (मुख्याध्यापक, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभाग), सुभाष मानकर (मुख्याध्यापक, मराठी माध्यम प्राथमिक विभाग), कैलास सत्रे (मुख्याध्यापक, मराठी माध्यमिक विभाग) कैलास म्हात्रे, (पर्यवेक्षक मराठी माध्यमिक विभाग) सर्व अतिथी गण उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शास्त्रज्ञ सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

विज्ञान दिनानिमित्ताने इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक रांगोळ्या, पर्यावरण जनजागृती व संवर्धन विषयक रांगोळ्या, मानवी शरीरातील विविध संस्था रांगोळीतून साकारल्या. इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी 'अंधश्रद्धा व त्यामागील विज्ञान' यावरील विविध प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविला. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्तच्या कार्यक्रमासाठी संतोष चव्हाण (मुख्याध्यापक, इंग्रजी माध्यम) यांनी विद्यार्थ्यांना उदबोधन पर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे निवेदन जागृती जाधव यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सारिका दिवेकर यांनी केले. यामध्ये विज्ञान समितीचे शिक्षक विद्या मावलीकर, मिलन म्हात्रे, वसुधा खरमाटे, वंदना कोळेकर, सुबोध दिवेकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी हे शनिवारी पनवेलमध्ये पिल्लई कॉलेजच्या पदवीदान समारंभाला आले होते. तेव्हा त्यांनी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते.**

## उरणमध्ये श्रीसदस्यांकडून स्वच्छता अभियान

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिना प्रित्यर्थ उरण शहर व परिसरात डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मभूषण डॉ.श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ.श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली १ मार्च २०२६ रोजी सकाळी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत १५७७ श्री सदस्यांनी सहभाग घेतला.या स्वच्छता मोहिमेत ओला कचरा–१३.९ टन, सुका कचरा–१९.७५१टन गोळा करण्यात आला. स्वच्छतेविषयी समाजात, जनतेत जनजागृती व्हावी, आपले शहर स्वच्छ सुंदर व निरोगी राहावे या अनुषंगाने उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मभूषण डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी स्वच्छता अभियानाचे आयोजन केले जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राबविलेल्या स्वच्छता अभियानाला जनतेचा, नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.



# पनवेल तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महसूल विभाग आपल्या दारी राज्यातील सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाच्या निर्देशानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रायगड जिल्हयात या अभियानाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यात या अभियानाचे आयोजन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे व निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल व मिनल भोसले–भामरे, तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, पनवेल यांच्या नेतृत्वाखाली मंडळस्तरावर करण्यात आले आहे.

या अभियानाचे प्रमुख उद्दीष्ट महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान व्हावे, या उद्देशाने नागरिकांच्या महसूली तक्रारीचे तात्काळ निराकरण करणे, प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जलदगतीने निर्णय करणे, प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे तसेच विविध दाखल्यांशी संबधित अडचणी दूर करणे यासाठी प्रत्येक जिल्हयातील तालुक्यात मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्व तयारी येणार असून प्रत्यक्ष शिबिरांची सुरुवात ७ मार्चपासून होणार आहे.

तहसील कार्यालय पनवेल यांचेमार्फत पनवेल तालुक्यात तळोजे येथे सात मार्च, कळंबोली येथे १४ मार्च, पळस्पे येथे १७ एप्रिल, ओवळे येथे १० एप्रिल, पनवेल येथे आठ मे रोजी मंडळनिहाय समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल तालुक्यातील तृतीयपंथी यांचेकरीता सर्व योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा–तात्काळ सेवा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी–जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे, वारस नोंद प्रक्रिया, कालबाहय बोजे कमी करणे, उत्पनाचे व जातीचे दाखले वाटप करणे, जमिनीचे तुकडेबंदी कायदयातील सुधारणा, एक वेळेचे अधिमुल्य भरण्याची सोपी व्यवस्था, डिजीटल स्वाक्षरीयुक्त ७/१२ उतारेबाबत नागरीकांचे प्रबोधन, ॲग्रीस्टॅक या सेवा समाधान शिबीरामध्ये सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

पनवेल तहसील कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपले मंडळ मुख्यालयी दिलेल्या तारखाना कागदपत्रांसह उपस्थित रहावे व या अभियानामध्ये मिळणारे सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसीलदार पनवेल मिनल भोसले–भामरे यांनी केले आहे.

# 'टीआयपीएल'मध्ये महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेल (टीआयपीएल) कंपनी अंतर्गत तक्रार निवार समिती (आयसीसी) या महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात कार्यरत असलेल्या POSH ICC (Prevention of Sexual Harassment - Internal Complaints Committee)ची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी (दि.२८) सायंकाळी ४ वाजता मुख्य कार्यालयातील कॉन्फरन्स रूममध्ये आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीदरम्यान POSH ICC संदर्भातील महत्त्वाची माहिती, नियम व मार्गदर्शक तत्त्वे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेतील सर्व महिला कर्मचारी व संबंधित कर्मचारी या बैठकीस उपस्थित होते.

महिलांसाठी सुरक्षित व सन्मानजनक कार्यस्थळ निर्माण करण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची असल्याचे कंपनीकडून नमूद करण्यात आले.

या बैठकीला महिला हक्क क्षेत्रातील प्रतिनिधी तथा नगरसेविका दर्शना भोईर, आयसीसी अध्यक्ष मनिषा अमित शाह, आरएमसी प्रभारी सदस्य जयश्री कमलाकर पाटील, सदस्य दीपक किशोर सिन्हा आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# जागतिक संघर्षाचा वणवा

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या भीषण हल्ल्याने मध्य पूर्व आशियातील संघर्षाचा वणवा आता नियंत्रणाबाहेर गेला आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी या हल्ल्यात ठार झाल्याच्या दाव्याने संपूर्ण जगात खळबळ उडाली असून इराणनेही अमेरिकन तळांवर प्रतिहल्ला चढवून युद्धाचे रणशिंग फुंकले आहे. हा संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित न राहता जागतिक शांतता आणि अर्थव्यवस्थेला भस्मसात करणारा ठरू शकतो.

**गेल्या अनेक दशकांपासून धगधगणाऱ्या मध्य पूर्व आशियातील संघर्षाने आता एक असे वळण घेतले आहे, ज्याची भीती संपूर्ण जगाला होती. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी ठार झाल्याचा दावा केला जात आहे. जर हा दावा सत्य असेल, तर हा केवळ एका देशाच्या नेत्याचा अंत नसून संपूर्ण मध्य पूर्वेच्या भू-राजकीय नकाशात झालेला महाविस्फोट आहे. इराणनेही याला प्रत्युत्तर देत आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर आणि थेट इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली आहेत. या घडामोडींमुळे मध्य पूर्व आशिया केवळ युद्धाच्या खाईत लोटला गेला नसून जग तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत उभे ठाकले आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील 'छुप्या युद्धा'चा इतिहास जुना आहे, मात्र अलीकडच्या काळात 'हमास', 'हिजबुल्लाह' आणि 'हूथी' बंडखोरांना इराणकडून मिळणाऱ्या पाठबळामुळे इस्रायलची सहनशीलता संपली होती. अमेरिकेने या मोहिमेत इस्रायलला साथ देणे हे स्पष्ट संकेत आहेत की आता पाश्चिमात्य राष्ट्रांनी इराणमधील इस्लामिक राजवट मुळापासून उखडून टाकण्याचा निर्धार केला आहे. अयातुल्ला अली खामेनी हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर ते इराणच्या धार्मिक आणि लष्करी सत्तेचा केंद्रबिंदू होते. त्यांच्यावरील हल्ला हा इराणच्या सार्वभौमत्वावर केलेला सर्वात मोठा प्रहार आहे. इराणने आपल्या सर्वोच्च नेत्याच्या मृत्यूचा बदला घेण्याची घोषणा करत आखाती देशांतील (कतार, बहरीन, कुवेत) अमेरिकन तळांना लक्ष्य केले आहे. याशिवाय इस्रायलच्या तेल अवीव आणि हायफा सारख्या शहरांवर क्षेपणास्त्रांचा पाऊस पाडून इराणने हे सिद्ध केले आहे की त्यांच्याकडे अजूनही मोठ्या प्रमाणावर प्रतिकार करण्याची क्षमता आहे. इराणच्या या पावलामुळे सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि जॉर्डन यांसारख्या देशांची कोंडी झाली आहे. मध्य पूर्वेतील या तणावाचा सर्वाधिक फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसणार आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील तेलाच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. इराणने हा मार्ग रोखल्यास कच्च्या तेलाचे दर वाढतील. यामुळे जगभरात महागाईचा भडका उडेल. लाल समुद्र आणि आखाती प्रदेशातील युद्धामुळे आशिया आणि युरोपमधील व्यापार ठप्प होण्याची शक्यता आहे. या युद्धात केवळ अमेरिका आणि इस्रायल सहभागी नाहीत. इराणचे रशिया आणि चीनशी असलेले धोरणात्मक संबंध पाहता हे युद्ध द्विध्रुवीय होण्याचा धोका आहे. रशिया आधीच युक्रेन युद्धात अडकलेला असला, तरी इराणला लष्करी मदत देऊन तो अमेरिकेला अडचणीत आणू शकतो. दुसरीकडे चीन आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी इराणवर अवलंबून आहे. जर चीनने इराणची उघडपणे पाठराखण केली, तर जगाचे दोन स्पष्ट गट पडतील, जे महायुद्धाचे लक्षण असेल. मुत्सद्देगिरी आणि चर्चेच्या माध्यमातून हा वणवा विझवला नाही, तर मध्य पूर्वेतून उठलेली ही धग संपूर्ण जगाला भस्मसात केल्याशिवाय राहणार नाही. अशावेळी शक्तीप्रदर्शनापेक्षा संयम पाळणे आणि संवादाची दारे उघडी ठेवणे हेच जागतिक शांततेसाठी हिताचे ठरेल. जागतिक समुदायाने विशेषतः संयुक्त राष्ट्रांनी आता केवळ प्रेक्षक न राहता तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज आहे.**

# होळीचा सण आणि धुळवडीची रंगत

फाल्गुन महिन्यात येणारी पौर्णिमा ही होळी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. हिला 'हुताशनी पौर्णिमा असंही म्हणतात. मुळात शिशिर ऋतू हा गारवा घेऊन येतो तसाच तो पानगळही सुरू करतो. पानगळ होऊन पानांचा भला मोठा ढीग जमा व्हायला लागतो. झाडांचे अक्षरशः उभे खराटे दिसायला लागतात. अशावेळी थंडीच्या गारव्यातून शरीर मनाला थोडी ऊब देणारी होळी साजरी होते. ही होळी प्रज्वल्वित करण्यासाठी ही खराटे झालेली झाडे आणि जमा झालेला पाचोळा मुख्यतः वापरावा असा संकेत आहे.

होळी सणाची माहिती आणि इतिहास समजून घेताना यामागची ही गोष्ट तुम्हाला माहितीय का? हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद हा विष्णूभक्त होता. हिरण्यकश्यपूला अमरत्वाचे वरदान मिळालेले असल्याने तो उन्मत्त झाला होता आणि त्याच्याशिवाय अन्य कोणाही देवाचे पूजन, प्रार्थना करायच्या नाहीत असा त्याचा हुकूम होता, पण त्याचाच मुलगा प्रल्हाद सतत विष्णूचे नामस्मरण करीत असल्याने त्याने आपल्या मुलालाच मारून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने आपली बहीण होलिका हिला बोलाविले.



होलिका कधी अग्नीने जळू शकत नाही असा तिलाही वर मिळालेला होता. होलिकेने भक्त प्रल्हादाला मांडीवर घेतले आणि जाळून टाकण्याचा प्रयत्न केला, पण विष्णूच्या कृपेने प्रल्हाद वाचला आणि स्वतः होलिकाच जळून गेली असे ही आख्यायिका सांगते.



अशा आख्यायिका आधुनिक काळाच्या कसोटीवर विश्वासनीय वाटत नसल्या तरी त्यातून सुरू झालेल्या परंपरा मात्र आजही पाळल्या जातात असे आपण अनुभवतो. मुलांना होळी सणाची माहिती सांगताना मात्र त्या परंपरेमागचा कार्यकारणभाव आपण नक्की सांगितला पाहिजे. होळी प्रज्वलित करण्यासाठी मुळातून जिवंत झाड तोडण्याची आवश्यकता नाही. पडलेल्या झावळ्या, पालापाचोळा यांचा उपयोग करून होळी प्रज्वलित केली जाते.

संपूर्ण भारतात होळी साजरी होतेच, पण महाराष्टात कोकण भागात होळीचे महत्त्व आहे. रबीचा हंगाम संपलेला असतो आणि पीक कापणीला येते. कोकणात तर या काळात थोडा शेतीतील निवांतपणा असतो. कोकणात शिमग्याचा हा उत्सव पंधरा दिवस चालतो.

अशावेळी गावातील शेतकरी समाज वेगवेगळी सोंगे धारण करून गावात खेळ करीत फिरतात.प्रत्येक गावातील ग्रामदेवता पालखीत बसून वाजत गाजत गावातल्या प्रत्येक घरी येते. तिचे विशेष स्वागत केले जाते.

संकासुर, गोमू, नाचा, राम, लक्ष्मण, दशावतार यांचे खेळ घराघरापुढे सादर होतात. शिमगोत्सव हा कोकणात असा विशेष आनंद देणारा असतो.

समुद्रकिनाऱ्यावरील बंदरांवर राहणारा कोळी समाजही होळी पेटवतो आणि दुसर्या दिवशी नावा सजवून समुद्रात नेऊन नावेची पूजा करतो. होळीचा दुसरा दिवस धूळवडीचा. होळी शांत झाल्यावर तिची राख अंगाला लावण्याची प्रथा आजही ग्रामीण भागात दिसून येते. पाच दिवसांनी येणाऱ्या रंगपंचमीचा उत्सव खरंतर वसंत पंचमीलाच सुरू होतो. उन्हाळ्याची चाहूल लागल्याने वातावरणातला उष्मा सहन व्हावा म्हणून अंगावर पाणी उडवले जाते.

मध्ययुगात राजे रजवाडे आणि संस्थानिक पाण्यात केशर कालवून त्याने होळीचे महत्व सांगत रंगपंचमी साजरी करत असत.

उत्तर प्रदेशात कृष्ण आणि बलरामाच्या मंदिरात होळी निमित्त रास खेळली जाते. लाठमारीचा खेळ खेळला जातो. लोकगीते गायली जातात. रंग उधळले जातात. देवळात विशेष पूजा केली जाते.

होळी सणाची माहिती आपल्या छोट्या बालदोस्तांना सांगूया आणि ऋतूचक्राशी जवळचा असा हा उत्सव साजरा करूया. त्यातील पर्यावरणाला घातक गोष्टी आवर्जून टाळल्या आणि एकत्र जमून सणाचा आनंद घेतला तर पुढच्या पिढीपर्यंत हा सण आणि त्यातून मिळणारी मजा पोहोचविता येईल.

**(साभार : इंटरनेट)**

# स्वातंत्र्यसेनानी, कवयित्री सरोजिनी नायडू

भारतीय स्वातंत्र्यसेनानी व देशातील पहिल्या महिला राज्यपाल सरोजिनी नायडू यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला होता. त्या 'भारत कोकिळा' म्हणून प्रसिद्ध होत्या तसेच कवयित्री व उत्तम वक्त्याही होत्या.

सरोजनी नायडू यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. ती एक कवयित्री होती आणि बंगालीमध्ये लिहायची. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते. ते प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

सरोजिनी यांनी वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचा अभ्यास केला होता. १८९५मध्ये हैदराबादच्या निजामाने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले. सरोजिनी नायडू या हुशार विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्रजी, बंगाली, उर्दू, तेलुगू आणि पर्शियन भाषांचे चांगले ज्ञान होते. त्यांचा विवाह १८९८मध्ये डॉ. गोविंद



राजालू नायडू यांच्याशी वयाच्या १९व्या वर्षी झाला होता. त्यांनी घरीच इंग्रजीचा अभ्यास केला आणि वयाच्या १२व्या वर्षी मॅट्रिक पास केले. त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, परंतु इंग्रजी भाषेत कविता रचण्यात त्या हुशार होती.

नायडू यांनी गीत कविता या प्रकारात कविता निर्माण केल्या आणि त्यांच्या कविता १९०५, १९१२ आणि १९१७मध्ये प्रकाशित झाल्या. १९०६च्या कोलकाता अधिवेशनात गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भाषणाने नायडू राजकारणात सक्रिय होण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. गोपाळकृष्ण गोखले यांना त्या आपले 'राजकीय पिता' मानत.

सरोजिनी नायडू यांनी गांधीजींच्या अनेक सत्याग्रहांमध्ये भाग घेतला आणि 'छोडो भारत' आंदोलनात त्या तुरुंगातही गेल्या. २ मार्च १९४९ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सरोजिनी नायडू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# चॅट जीपीटी बनला जगातील दुसरा सर्वात लोकप्रिय ॲप

गेल्या काही काळापासून जगभरात 'एआय'चा वापर ज्या वेगाने वाढतोय, त्याचे प्रतिबिंब आता मोबाईल ॲप्सच्या आकडेवारीतून समोर आले आहे.




'सेन्सर टॉवर'च्या ताज्या जागतिक अहवालानुसार २०२५मध्ये चॅटजीपीटी हे जगातील दुसरे सर्वात जास्त डाउनलोड झालेले ॲप ठरले आहे. सध्या केवळ 'टिकटॉक' हे चॅटजीपीटीच्या पुढे असून एआय असिस्टंट्सच्या श्रेणीत चॅटजीपीटीने एकहाती वर्चस्व गाजवले आहे.

सेन्सर टॉवरच्या आकडेवारीनुसार २०२५मध्ये चॅटजीपीटीच्या डाउनलोड्समध्ये १४८ टक्क्यांची वाढ झाली आहे. केवळ डाउनलोडच नाही, तर या ॲपच्या प्रीमियम फीचर्ससाठी पैसे मोजणाऱ्यांच्या संख्येतही २५४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे वापरकर्ते या पवर पूर्वीपेक्षा ४२६ टक्के जास्त वेळ घालवत आहेत. या शर्यतीत गुगल जेमिनी, डीपसीक, मेटा एआय आणि मायक्रोसॉफ्ट को-पायलट यांसारख्या ॲप्सचाही समावेश आहे, परंतु चॅटजीपीटीने सर्वांना मागे टाकले आहे.

एआय ॲप्सच्या या वादळात गेमिंग ॲप्स काहीसे मागे पडल्याचे चित्र आहे, मात्र सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचे महत्त्व अजूनही टिकून आहे. गेल्या वर्षभरात जगभरातील युजर्सनी सोशल मीडिया ॲप्सवर तब्बल २.५ ट्रिलियन तास खर्च केले आहेत. सरासरी प्रत्येक युजर दररोज ९० मिनिटे सोशल मीडियावर असतो. या संपूर्ण यादीत 'टिकटॉक' अजूनही पहिल्या क्रमांकावर अढळ आहे.

एआय ॲप्स आणि चॅटबॉट्स डाउनलोड करण्याच्या बाबतीत भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. जगभरात डाउनलोड होणाऱ्या एकूण एआय ॲप्सपैकी २० टक्के डाउनलोड्स एकट्या भारतातून होतात, मात्र, एक विरोधाभास असा की, भारतीय युजर्स ॲप डाउनलोड करण्यात आघाडीवर असले तरी प्रीमियम फीचर्ससाठी पैसे खर्च करण्याच्या बाबतीत मागे आहेत. २०२५मध्ये जागतिक स्तरावर ॲपवर खर्च करणाऱ्यांपैकी भारतीय युजर्सचे प्रमाण केवळ एक टक्का इतकेच होते.

# अभिनयसम्राट डॉ. काशिनाथ घाणेकर

डॉ. काशिनाथ घाणेकर हे मराठी नाट्यअभिनेते व हिंदी-मराठी चित्रपट अभिनेते होते. सन १९६० ते १९८० या काळातले ते मराठीतले पहिले सुपरस्टार होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्याबद्दल जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

स्त्रीरोगतज्ज्ञ इरावती कर्णिक या काशिनाथांच्या पहिल्या पत्नी होत. त्यांच्याशी घटस्फोट घेतल्यावर काशिनाथ घाणेकर यांनी अभिनेत्री सुलोचनाबाईंची कन्या कांचन लाटकर यांच्याशी लग्न केले. कांचन घाणेकरांनी स्वतःच्या वैवाहिक सहजीवनावर 'नाथ हा माझा' नावाचे पुस्तक लिहिले आहे. अभिनय सुरू करण्याआधी घाणेकर व्यवसायाने दंतवैद्य होते. त्यांचा जन्म १४ सप्टेंबर १९३२ रोजी चिपळूण येथे झाला आणि तिथेच त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

आपल्याच नजरेत आपले आदरयुक्त व्यक्तित्व उभारण्याच्या अट्टाहासापोटी आयुष्याच्या शेवटपर्यंत झगडणारे, वैद्यकीय व्यवसायाद्वारे समाजात इज्जत मिळवून सत्कारयुक्त जीवन जगण्याऐवजी रंगमंचावर आपले श्वास शोधणारे, मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार होऊनही वडिलांच्या कौतुकाच्या शब्दासाठी पात्र न ठरणारे आणि ते दुःख आयुष्यभर कवटाळून रंगमंचावर अवतरल्यानंतर मिळणाऱ्या टाळ्या आणि शिट्ट्यांच्या धुंदीत आपले आयुष्यच उधळून



## निमित्त

लावणारे असे त्यांच्या व्यक्तित्वाचे धागे भल्याबुऱ्या सर्व रंगांसह विणले गेले. डॉ. घाणेकर यांनी आपल्या आयुष्याची क्षणभंगुरता आपल्या परीने याच निरर्थक हातवारे आणि तुर्रेबाजीने आपल्या परीने अर्थपूर्ण बनवली. त्यांचे अस्तित्व त्या रंगभूमीवर वावरण्याभोवती होते आणि त्यांचे प्राण समोरच्या गर्दीत होते.

दादी माँ या १९६६ साली निघालेल्या हिंदी चित्रपटात काशिनाथ घाणेकर यांनी अशोक कुमार आणि बीना रॉय यांच्या मुलाची एक छोटी भूमिका केली होती. वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातल्या संभाजी महाराजांच्या भूमिकेनंतर घाणेकरांना अफाट लोकप्रियता लाभली. या नाटकाशिवाय त्यांनी इतर अनेक नाटकांमध्ये उत्तम अभिनय केला. सन १९६८मध्ये निघालेल्या 'मधुचंद्र' या मराठी चित्रपटापासून घाणेकर मराठी चित्रपटसृष्टीतील एक मोठे अभिनेते बनले. नाटक रंगमंचावर पहिली शिट्टी पडली ती घाणेकर यांना. ज्यांच्या प्रवेशानेच टाळ्यांच्या कडकडाटात नाट्यगृहे दणाणून जात होती. त्यांच्या नावाने मराठी रसिकांना अक्षरश: वेड लावले होते. मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीमध्ये डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे अतुलनीय योगदान आहे. त्यांनी मराठी व्यावसायिक रंगभूमीला वैभवाचे दिवस आणले, अनेक तरुण अभिनेत्यांसाठी ते प्रेरणादायी ठरले. प्रभावशाली संवादफेक, जरब बसणारे डोळे आणि विशिष्ट पद्धतीने बोलण्याची त्यांची शैली अद्वितीय होती.

'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू', 'अश्रूंची झाली फुले', 'गारंबीचा बापू', 'आनंदी गोपाळ', 'शितू', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'मधुमंजिरी' या आणि अशा अनेक नाटकांमधील त्यांच्या भूमिका जबरदस्त गाजल्या. 'एकटी', 'झेप', 'देवमाणूस', 'पाठलाग', 'मधुचंद्र', 'सुखाची सावली', 'मानला तर देव' या मराठी चित्रपटांमध्येही त्यांनी अभिनय केला. अशा या महान अभिनयसम्राटाचे २ मार्च १९८६ रोजी निधन झाले. **(साभार : मायमहानगर)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तिसाव्या वाढदिवसानंतर महिलांच्या शरीरात होतात बदल

वयाच्या प्रत्येक टप्प्यावर शरीरात वेगवेगळे बदल होत असतात. वयाची पस्तीशी हा सगळ्यांसाठीच महत्वाचा टप्पा असतो. मग ते पुरुष असो वा महिला.



खासकरून महिलांच्या शरीरात या वयात बरेच बदल होतात, ज्यांचा फार विचार केला जात नाही म्हणा किंवा त्यांकडे लक्ष दिलं जात नाही. महिलांच्या शरीरात हळूहळू काही बदल दिसू लागतात. हे बदल अचानक होत नाहीत, पण काळानुसार जाणवू लागतात. अनेकदा या गोष्टींबद्दल उघडपणे चर्चा होत नाही, त्यामुळे अनेक महिलांना शरीरात नेमके काय बदल होत आहेत हे समजत नाही. चला, या बदलांबद्दल जाणून घेऊया.

पस्तीशीनंतर महिलांच्या शरीरात सर्वप्रथम हार्मोन्समध्ये बदल होऊ लागतो. शरीरातील ॲस्ट्रोजन हार्मोनचं प्रमाण थोडं कमी होऊ लागतं. त्यामुळे मासिक पाळी कधी वेळेवर येतात तर कधी उशिरा होतात. यामुळे मूड पटकन बदलू शकतो आणि कधी कारण नसताना राग किंवा निराशा जाणवू शकते.

या वयानंतर आधीसारखेच खाल्ले तरी वजन वाढू शकते. खासकरून पोट आणि कंबरेभोवती चरबी जमा होऊ लागते. याचं कारण म्हणजे शरीराची मेटाबॉलिज्म प्रक्रिया थोडी मंदावते. त्यामुळे या वयानंतर आहारावर विशेष लक्ष देणं आवश्यक ठरतं.

३५ वर्षांनंतर हाडांची ताकद हळूहळू कमी होऊ लागते. शरीराला पुरेशा प्रमाणात कॅल्शिअम आणि व्हिटामिन डी मिळाले नाही तर सांधेदुखी किंवा हाडांशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

वयानुसार त्वचा आणि केसांमध्येही बदल दिसू लागतो. त्वचा थोडी सैल किंवा निस्तेज वाटू शकते आणि केस आधीपेक्षा जास्त गळू शकतात. यामागे वाढते वय, हार्मोन्समधील बदल आणि ताणतणाव ही कारणे असू शकतात.

या वयानंतर झोप आधीसारखी गाढ लागत नाही. अनेक महिलांना रात्री वारंवार जाग येण्याची समस्या जाणवते. त्यामुळे दिवसभर थकवा जाणवू शकतो.

काय करावे?

रोज थोडा एक्सरसाईज करा. संतुलित आहार घ्या. दररोज काही वेळ सूर्यप्रकाशात बसा. वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घ्या.

# स्वच्छतेद्वारे नानासाहेब धर्माधिकारींना आदरांजली

**माथेरान : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण थोर समाजसुधारक तिर्थरूप नाना साहेब धर्माधिकारी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त माथेरान श्रीसदस्यांनी संपूर्ण शहरात स्वच्छता अभियान राबवून त्यांना आदरांजली अर्पण केली. या वेळी माथेरानमधील सर्व नगरसेवक नगरसेविका आणि असंख्य माथेरानकर तसेच नगर परिषद कर्मचारी वृंद हेदेखील स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

महाराष्ट्र भूषण, ज्येष्ठ निरूपणकार आणि थोर समाजसुधारक नानासाहेब धर्माधिकारी यांनी बैठकीच्या माध्यमातून अनेक श्री सदस्य घडविले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातुनचं नव्हे तर संपूर्ण भारतातुन आणि परदेशातून देखील बैठकीच्या माध्यमातून श्री सदस्य घडविले गेले आहेत. रविवार १ मार्च २०२६ या त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त माथेरान मधील श्री सदस्यांनी संपूर्ण माथेरान शहरात स्वच्छता मोहीम राबिवली. यामध्ये येथील प्राथमिक मराठी शाळा परिसर, माथेरान नगरपरिषद कार्यालय परिसर, पोलीस ठाणे परिसर, वनविभाग कार्यालय परिसर तसेच माथेरान दस्तुरी नाका परिसर, बाजार पेठ, महात्मा गांधी रस्ता, याचबरोबर हॉटेल विभाग, पॉईंट परिसर या भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

नाना स्वारींच्या प्रतिमेला माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर नगरसेवक शिवाजी शिंदे, मनोज खेडकर आणि नगरसेविका रिजवाना शेख यांनी तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांच्याबद्दल आपले अनमोल विचार व्यक्त करीत सर्व श्री सदस्यांचे आभार मानले.तर उपस्थित नगरसेवकांनी या स्वच्छता अभियान सहभागी होत शहराची स्वच्छता केली.



## मुरूडमधले रस्ते झाले चकाचक!

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्रभूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दी निमित्ताने मुरूडमध्येही स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

शहरात सबनीस आळी, गावदेव पाखाडी, हरिजन वाडा, दस्तुरी नाका, लक्ष्मीनारायण मंदिर, गणेश आळी, मुरूड कोळीवाडा येथील मुरूड शहराच्या रस्त्याच्या दुतरफा वाढलेली झाडी व रस्तावर आडव्या येणाऱ्या फांद्या कापून रस्ता स्वच्छ व अपघात मुक्त करण्यात आला. यासाठी मुरूड तालुक्यातील ५१३ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला व ओला कचरा २.५ टॅन व सुखा कचरा १.५ टॅन गोळा करून तेलवडे येथील डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात आला.

सचिनदादांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

### जाहिर नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

अनिल विठ्ठल कुथे,
रा. मुंढाणी, पो. बेणसे, ता.पेण, जि. रायगड. — अर्जदार

**विरुद्ध**

ग्रामपंचायत मुंढाणी,
ता.पेण, जि.रायगड. — सामनेवाला

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी नेत्रा अनिल कुथे हिचा जन्म दिनांक १९/०७/२०१० रोजी मौजे मुंढाणी, ता.पेण, जि. रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मुंढाणी, ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

**ठिकाण:– पेण**
**दिनांक:– १/०३/२०२६**
(शिक्का)

**सही /–**
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी पेण**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर,**
**यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल– tahasil khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ६०/२०२६, ११५३

१) श्री. मोहन हाड्कु देवकर
रा. आमडोशी, पो. पाटणसई,
ता. रोहा, जि. रायगड — यादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म–मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत चिलठण, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः– जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. मोहन हाडकु देवकर, रा. आमडोशी, पो. पाटणसई, ता. रोहा, ता.खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील के. हाडकु जयराम देवकर यांचा मृत्यू दिनांक १०/०९/१९७४ रोजी उसरोली, पो. डोणवत, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि२५/२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**ठिकाण:– खालापूर**
**दिनांक:– १/०३/२०२६**
(शिक्का)

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

**नोंदणी क्र. महाराष्ट्र १२२/९६ (रायगड)**

**वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना**
**(फक्त सभासदांसाठी)**

दिनांक : २८/०२/२०२६

**प्रति,**
**मा. सभासद.......................................................... यांस**
**रा,.......................................................... ता. पनवेल**

**महोदय,**

आपणास कळविण्यात येते की, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची तिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेस उपस्थित राहून आपण सहकार्य करावे हि विनंती.

**–: सभेपुढील विषय :–**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या संचालक मंडळाने घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३) मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्सविषयी घेतलेल्या धोरणात्मक महत्वाच्या निर्णयांना व त्यावर केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
४) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे २०२४–२०२५ या वर्षाचे हिशेब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च, ताळेबंद व हिशेब वाचून मंजूर करणे.
५) सन २०२६–२०२७ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संम्मत करणे.
६) सन २०२५–२०२६ या वर्षा करिता हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे.
७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयांवर चर्चा करणे..

**सही/–**
**प्रशांत ठाकूर**
**अध्यक्ष**
**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ**

**विशेष सूचना :**

१) गणसंख्येच्या अभावी हि सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना अहवाल व जमा खर्चाची अधिक माहिती हवी असेल त्यांनी ती लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी सात दिवस आधी कळवावी. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
३) संस्थेच्या सभासदांनी त्यांचे बदललेले पत्ते संस्थेस लेखी स्वरुपात कळवावे.

**प्लॉट क्रं. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. फोन: ०२२–६४५२९५२५**

## तळा तालुक्यात साफसफाई

**तळा :** महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्ताने पद्मश्री डॉ. श्री.आप्पासाहेब धर्माधिकारी डॉ.श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने नगरपंचायत तळा येथे १ मार्च २०२६ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले या स्वच्छता अभियानामध्ये एकूण १३० श्रीसदस्यांनी सहभाग घेतला.

या अभियानास सकाळी तळा शहराच्या मुख्य फाट्या पासूनच्या रस्त्याचे आसावरी हॉटेलपर्यंत, पोलीस ठाणे परिसर व रस्त्याची स्वच्छता सकाळी करण्यास सुरुवात केली. यावेळी श्रीसदस्यांनी सकाळी स्वच्छतेची साधने घेऊन साफसफाई केली. यामध्ये रस्त्यांच्या दुतर्फा असलेली कचरा प्लास्टिक बाटल्या उचलून शहराच्या स्वच्छतेचे काम स्वयंस्फूर्तिने व शिस्तबद्धतेने केले. तळा नगरपंचायत अंतर्गत तळा शहराच्या मुख्य फाट्यापासून आसावरी हॉटेल पर्यंत,पोलिस स्टेशनचा परिसर व रस्त्याचे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानामुळे तळा शहर स्वच्छ झाले आहे.


### दैनिक रामप्रहर

**वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन**

(सेंट्रल रूल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**प्रकाशन स्थळ :** अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित
**प्रकाशनाचे कालमान :** दैनिक
**मुद्रकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**प्रकाशकाचे नांव :** कृष्णा चांगू ठाकूर
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** प्लॉट नंबर ६, रोड नंबर ६, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पिटलसमोर, नवीन पनवेल.
**संपादकाचे नांव :** देवदास लक्ष्मण मटाले
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** टॉवर ५, फ्लॅट नं. ६४, गोदरेज गार्डन इन्क्लेव्ह, विक्रोळी (पूर्व), मुंबई – ४०० ०७९

मी **कृष्णा चांगू ठाकूर** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. ०२ मार्च २०२६

**सही/–**
**कृष्णा चांगू ठाकूर**
**(प्रकाशकाची सही)**


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ७६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १२/०२/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील अशुद्ध व शुद्ध जलउदंचन केंद्रातील १५०/७५/५० अश्वशक्ती क्षमतेच्या पंपिंग मशिनरीच्या सुट्या भागांसह दुरुस्ती व ओव्हरहॉलिंग करणे. | ₹ ३९,४७,०१९.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### जाहीरात

**अल्पसख्यांक तेलगू भाषिक कोट्यातील जागा भरण्याकरिता एम एन आर स्कूल ऑफ एक्सलन्स**

**पत्ता :– प्लॉट नंबर २८, सेक्टर –७, कामोठे, नवी मुंबई**
**व**

**एम एन आर इंटेरनॅशनल स्कूल मुंबई गोवा महामार्ग पळस्पे, पनवेल**

अप्लसख्यांक तेलगू भाषिक विद्यार्थांसाठी शाळेतील रिक्त जागा भरण्या करता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येत असून. जे तेलगू भाषिक इच्छुक आहे. त्यांनी आजच आपला प्रवेश निश्चित करा. प्रवेश घेणाऱ्या पालकांनी अधिक माहितीसाठी शाळेची वेबसाइट व शाळेशी परस्पर संपर्क साधावा.

अर्ज करण्याची दिनांक ०१.०३.२०२६ पासून सुरु होत आहे व अंतिम तारीख ३१.०३.२०२६. अर्ज छाननी व यादी प्रसिद्धी १.०४.२०२६ ते १५.०४.२०२६ वेळ : स.१०.०० ते सायं. ४.३० करण्यात येईल अर्जासोबत

**आवश्यक कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.**

**संपर्क :–** ८४५१८००७०६ – https://mnrsek.mnrindia.org/
८४५१८९४७७७ – https://mnrisp.mnrindia. org

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८३/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... कुंडलिका खाडीतील अंतिम सांडपाणी विसर्जन बिंदूवर खारगाव ते गोफण पर्यंतच्या सांडपाणी निःसारण वाहिनीची (पाण्याखालील वाहिनी) वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,२३,२६०.०० |
| २ | अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... पोयनाड जलशुद्धीकरण केंद्रातील अशुद्ध व शुद्ध जलउदंचन केंद्र, फिल्टर बेडची ऑपरेटिंग सिस्टम व इंटर कंपॅटिबिलिटीची देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,९१,६८८.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील ५ व्या क्रॉस रस्त्यावरील १५० मि.मी. व्यासाची जुनी सांडपाणी निःसारण वाहिनी ३१५ मि.मी. व्यासाच्या एचडीपीईने वाहिनीने बदलणे. | ₹ ३६,८५,०६४.०० |
| ४ | नागोठाणे औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... नागोठणे येथील आयपीसीएल रॉ वॉटर येथे ३२० केव्हीए डीजी सेटचे स्थलांतर व कार्यान्वित करणे. | ₹ १४,०८,१०९.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०४/०३/२०२६ ते दिनांक १८/०३/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०९/०३/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/०३/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# पनवेल परिसरात श्रीसदस्यांकडून स्वच्छता अभियान

**पनवेल : वार्ताहर**

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या प्रेरणेने व डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ.सचिनदादा धर्माधिकारी मार्गदर्शनाखाली १ मार्च रोजी पनवेल तालुक्यातील नेरे, चेरीवली, वाकडी, रिटघर, दूंदरे, सुकापूर आणि कुडेवहाळ या गावांमध्ये व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या उपक्रमात तब्बल १५३४ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेत एकूण ९७५० चौ.मी. परिसर स्वच्छ केला. शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलिस चौकी तसेच स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. मोहिमेदरम्यान सुमारे १९८३० किलो कचरा गोळा करण्यात आला. संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक पोलीस पाटील, डॉक्टर आणि स्थानिक नागरिकांनीही



उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून सामाजिक बांधिलकीची जाणीव जागृत करणारी ठरली. प्रतिष्ठान गेली अनेक वर्षे समाजप्रबोधन, व्यसनमुक्ती अभियान, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती, शिक्षणविषयक मार्गदर्शन आणि आपत्तीग्रस्तांना मदत अशा विविध उपक्रमांतून समाजहिताचे कार्य सातत्याने राबवत आहे. स्वच्छता हीच सेवा मानत प्रतिष्ठानचे दास यांनी शिस्तबद्ध व संघटित पद्धतीने समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ग्रामीण भागात स्वच्छतेची सवय रुजविणे, नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणे हेच या अभियानामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. या उपक्रमामुळे परिसर स्वच्छ होण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छ-सुंदर माझा गाव प्रेरणादायी समाज प्रबोधनयुक्त स्वच्छता अभियान दिसून आले.

# रसायनीतही दासभक्तांनी दिला स्वच्छतेचा संदेश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिनी स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण रसायनी परिसर स्वच्छ करण्यात आला. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या मार्फत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी, राहुल दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छता मोहीम आयोजित केली होती.



यावेळी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा हद्दीतील स्टेट बँक ऑफ इंडिया समोरील रस्ता, रसायनी पोस्ट ऑफिस,मोहोपाडा तळाठी कार्यालय, जनता विद्यालय शाळेचा कॉर्नर, पराडे कॉर्नर, मोहोपाडा प्राथमिक आरोग्य केंद्र,राजिप मराठी शाळा मोहोपाडा तसेच रसायनी पोलीस स्टेशन आदी परिसरात स्वच्छता करण्यात आली.

यावेळी शेकडो दासभक्त हातात विला, पंजा, झाडू, कोयता, गोणी, फावडे, प्लास्टिक शिट घेऊन हातात ग्लोज,मास्क लावून स्वच्छता साहित्य हातात घेऊन रसायनी परिसराची स्वच्छता करत असल्याचे दिसून आले.

---

# लिमये वाचनालयात मराठी भाषा गौरव दिन

**पनवेल : वार्ताहर**

के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, आणि कोमसाप शाखा-पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन, स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी, मराठी भाषा गौरव दिन व कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते.

सभेच्या अध्यक्ष वाचनालयाचे उपाध्यक्ष बी.पी. म्हात्रे, कोमसाप पनवेल अध्यक्ष कुडके, सचिव विजय द.गायकर, खजिनदार काशिनाथ जाधव जयश्री शेटे मॅडम, रोहिदास पोटे उपस्थित होते.

राजकुमार ताकमोघे, प्रकाश पाटील, शिवाजी मोटे, नंदकुमार शिंदे, मीनल वसमतकर, करकरे मॅडम, विजय चव्हाण, नागनाथजी डोलारे, स्मिता गांधी, श्रद्धा तारे यांनी कविता सादर केल्या.



# सीकेटी कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विज्ञान संघटना राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतातील बीएएसएफ ग्रुपचे माजी वरिष्ठ जीएम आणि प्रमुख संशोधन तसेच नेहरू विकास केंद्र व विज्ञान केंद्राचे माजी मुख्य मार्गदर्शक, इनोव्हेशन हब वायसीएमओयूचे माजी प्रादेशिक संचालक डॉ. प्रभोध चोबे, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, परीक्षा नियंत्रण विभाग प्रमुख डॉ. एस. आय. उन्हाळे, विज्ञान विभागाच्या



प्रो.डॉ. जे.एस. ठाकूर, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.एम.ए.म्हात्रे, डीएलइई विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. एस.एन. वाजेकर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.एन.सी. वडनरे , सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा.जे.एस. साठे व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. डॉ. वाय.एस. मुनीव तसेच विज्ञान शाखांच्या विविध विभागांचे प्रमुख यांनी उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात २४ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सायन्स हर्डल, वैज्ञानिक प्रश्नमंजुषा स्पर्धा, ट्रेजर हंट, ओपन माईक स्पर्धा इत्यादींचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात २८ फेब्रुवारी २०२६ प्रमुख पाहुणे डॉ. प्रभोध चोबे यांनी आपल्या भाषणात शास्त्रज्ञाचे शोध विषयी माहिती, झिपचा फाइल शोध कसा लागला, एक्स-रेचा शोध कुठे व कसा लागला, यंत्राचा जुना शोध व नॅनो कारशी संबंधित माहिती अश्या विविध संशोधण विषयी अत्यंत उत्तमरीत्या सांगितले. त्याचबरोबर त्यांनी विविध कल्पनांन विषयी संवाद साधला. तसेच राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचीत्य साधून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सायन्स हेराल्डचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी विज्ञान विभागाच्या प्रो.डॉ. जे.एस. ठाकूर यांनी महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचा व महाविद्यालयाच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा मागोवा घेतला. तसेच विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. डॉ. वाय. एस. मुनीव यांनी विज्ञान संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा दिला. या दिवशी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुणे डॉ. प्रभोध चोबे यांच्या हस्ते करण्यात आला.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. श्वेता हंबीरवाडी यांनी प्रमुख पाहुणे डॉ. प्रभोध चोबे यांचा परिचय उपस्थितांना करून दिला. सूत्रसंचालन विज्ञान विभागाची विद्यार्थिनी सिद्धी यांनी केले तसेच भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा. प्राजक्ता म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

---

# नवी मुंबई पालिकेत मराठी भाषा गौरव दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

जगातील सर्व भाषांवर प्रेम करतांना मायबोली मराठी भाषेवर आपली माया आहे, अशा शब्दांत मराठीचे महत्व सांगत नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांनी मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी आपण कुणाशीही संवाद साधतांना पहिल्यांदा मराठी भाषेतच बोलले पाहिजे, व त्याला ती भाषा समजत नसेल तर त्याला समजणा-या इतर भाषेचा आधार घेतला पाहिजे अशा शब्दात मराठी जपण्याची व विकसीत करण्याची आपली सामुहिक जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले.

नवी मुंबई



महानगरपालिकेच्या वतीने २७ फेब्रुवारी या मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सुप्रसिध्द गजलकार आप्पा ठाकूर यांच्या 'गुंतलेले पाश' या मराठी गजल सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उपमहापौर दशरथ भगत, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, सहा.वैद्यकिय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, सहा.आयुक्त स्वरुपा परळीकर व दिपाली दिवेकर आणि अधिकारी, कर्मचारी व साहित्यप्रेमी रसिक उपस्थित होते. गजलकार आप्पा ठाकूर यांचा उपमहापौर दशरथ भगत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानिमित्त आयोजित केलेल्या अभिनव 'शब्दकोडे' स्पर्धेमध्ये ४२ अधिकारी, कर्मचारी, नागरिक यांनी सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केला.

# डी.वाय. पाटील विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ नवी मुंबई स्थित डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या विधी विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि मराठी भाषा गौरव दिन अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रमुख पाहूणे म्हणून व्याख्याते मधुकर वारभुवन यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा विधी विभागाच्या संचालिका प्रो. डॉ. करुणा मालवीय होत्या. वारभुवन यांनी छ. शिवाजी महाराज आणि मराठी भाषा गौरव दिन या दोन्ही विषयांवर सुश्राव्य मार्गदर्शन केले कविता, पोवाडा गाऊन आणि ऐतिहासिक उदाहरणे देऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली.

संचालिका डॉक्टर करुणा मालवीय यांनी मराठीभाषेचे महत्व सांगून कार्यक्रमाच्या आयोजनाच्या उद्देशा बाबत संवाद साधला आणि वारभुवन व विविध कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थी व प्राध्यापक तसेच उपस्थितांचे आभार मानले.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ.जी.नाईक महाविद्यालय कोपरखैरणे, येथे महाविद्यालयाच्या प्रांगणात स्टुडंट्स कौन्सिलिंग समिती अंतर्गत पारितोषिक वितरण समारंभ आणि मराठी वाङ:मय मंडळ ग्रंथालय समिती, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या अंतर्गत मराठी भाषा गौरव दिन आयोजित करण्यात आला होता.





प्रमुख अतिथी म्हणून श्रमिक शिक्षण मंडळाचे समन्वयक नरेंद्र म्हात्रे, एफ. जी.नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, रा. फ. नाईक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका सीमा म्हात्रे आणि पूर्व प्राथमिक विभागाच्या एलन फर्नांडिस, इंग्रजी प्राथमिक विभाग सुमती सुपैया तसेच स्टूडेंट कौन्सिलच्या प्रमुख प्रा. कविता पवार समिती सदस्य प्रा. समिधा पाटील, प्रा.प्रमोद साळुंखे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमांतर्गत मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी वाङ:मय मंडळ व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमानाने संपादित विद्यार्थी हस्तलिखित 'अक्षराकाश' याचे अनावरण प्रमुख अतिथी नरेंद्र म्हात्रे, प्रा.प्रताप महाडिक यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयात मोठ्या उत्साहात मराठी भाषा गौरवाची घोषवाक्य देत संगीताच्या व गाण्यांच्या तालावर विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडी सोहळा साजरा केला.

---

# पनवेलच्या एकता मित्र मंडळातर्फे हॉलिकोत्सव, सत्यनारायण पूजा

**पनवेल : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे एकता मित्र मंडळ लाईन आळी तर्फे सार्वजनिक हॉलिकोत्सव (होळी) व संत तुकाराम महाराज बीज निमित्त सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री हनुमान मंदिर, कै.दशरथशेठ धोंडू कुरघोडे, व छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे.

एकता मित्र मंडळ, लाईन आळी यंदा ५५ वर्ष पूर्ण करून ५६ व्या वर्षात पदार्पण करत आहेत, या निमित्ताने होळी उत्सव, सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसाद आयोजन त्याचप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम सोमवार २ मार्च रोजी होळी पूजन व लहान मुलांचे खेळ, ३ मार्च रोजी मुला - मुलींचे खेळ, ४ मार्च रोजी खेळ, खुला गट व महिला, ५ मार्च रोजी तुकाराम बीज निमित्त सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद शुक्रवार ६ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा होणार आहे. या मंडळाचे स्फुर्तीस्थान स्व.लक्ष्मणशेठ दशरथशेठ कुरघोडे हे आहेत.

एकता मित्र मंडळ लाईन आळी पनवेलच्यावतीने अध्यक्ष गौरव सावंत, उपाध्यक्ष कपिल कुरघोडे, सचिव अभिजित साखरे, खजिनदार मितेश भोपी, सदस्य अश्विन सातारकर, सनील बेंडखळे, विवेक पवार, सुमित दसवते, साहिल मोरे, मयुरेश कुरघोडे, कैलास गायकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नागरिकांना हॉलिकोत्सव, महापूजा व महाप्रसादासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# महात्मा फुले कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये बुधवार, ४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

समारंभास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत व प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. संजय जगताप, माजी सहसंचालक (उच्च शिक्षण) कोकण विभाग, पनवेल हे उपस्थित राहणार असून इतर मान्यवरांमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य जे.एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, महेंद्र घरत, वाय.टी.देशमुख, विभागीय अधिकारी, रायगड विभाग मा.कोंगेरे एम.के. आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. तरी सदर कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून गुणी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे व त्यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी केले आहे. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रमाचे कार्यवाह डॉ.रमेश म्हात्रउपप्रचार्य डॉ. लक्ष्मण गवळी यांचे मार्गदर्शन व सहकार्य राहणार आहे.

---

# गव्हाण विद्यालयात विज्ञान दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ.सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन शशिकला पाटील व रविंद्र भोईर यांचे हस्ते झाले.

यावेळी देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे व सर्व विज्ञान शिक्षकांसह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता पाचवी क या वर्गाच्या वतीने संपदा म्हात्रे यांनी कार्यक्रमाची आयोजन केले.



विज्ञान शिक्षक शितलकुमार म्हात्रे यांच्या संकल्पनेतून भारतीय वैज्ञानिकांच्या छायाचित्र व त्यांच्या माहितीचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले. सूत्रसंचालन निशांत ठाकूर व संपदा म्हात्रे यांनी केले. संदीप भोईर, प्रशांत परदेशी, शितलकुमार म्हात्रे, चारुशीला ठाकूर, मोनाली बाबर, वृषाली म्हात्रे, रंजीता पाटील यांनी शैक्षणिक साहित्याची मांडणी केली. आराध्य म्हात्रे, तृप्ती म्हात्रे, स्मिताली पाटील, अन्वेषा म्हात्रे, हर्षला पाटील यांनी गीत सादर केले.

# कळंबूसरे, चिरनेर, सारडे, वशेणी गावे नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत

**उरण : बातमीदार**

कळंबुसरे गावात मागील वर्षी २६ मे २०२५ रोजी सकाळी ६ वाजताचे सुमारास अचानक आलेल्या वादळी पावसामुळे कळंबूसरे गावासह चिरनेर, सारडे व वशेणी गावातील काही घरांचे असे तालुक्यातील ८० ते ८५ नागरिकांच्या घरांच्या छपरांचे व जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी कोप्रोली मंडळ अधिकारी के. डी.मोहिते आणि तलाठ्यांनी घटनास्थळी जाऊन, गावातील नुकसानग्रस्त घरांचे तात्काळ पंचनामे करून, त्याचा अहवाल उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या कार्यालयाकडे सुपूर्द केला होता, परंतु या घटनेला आठ महिने उलटूनदेखील अद्याप तालुक्यातील नागरिकांना मदत मिळालेली नाही.



उरण तालुक्यातील कळंबुसरे या गावात सुमारे ८० ते ८५ घरांच्या छापरांचे व घरातील जीवनावश्यक वस्तूंचे अचानक आलेल्या वादळी पावसात अतोनात नुकसान झाले होते. यामध्ये गतवर्षी सोमवारी २६ मे २०२५ रोजी सकाळी अचानक आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे येथील नागरिकांच्या घरांचे छप्परच उडाले होते. तर काही घरांच्या भिंतींची पडझड झाली होती. तर काही घरांमध्ये पाणी घुसले होते. दरम्यान, घराच्या संपूर्ण छपरा बरोबर घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

> **नुकसानभरपाई मिळावी असे आम्ही वर कळविले आहे. नुकसानभरपाई अजून आलेली नाही ती आल्यास लगेच वाटप केले जाईल.**
> **-डॉ. उद्धव कदम, तहसीलदार, उरण**

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी जयंतीनिमित्त रोहा शहरात भव्य स्वच्छता अभियान

**रोहा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने तसेच विविध पक्षांच्या सहकार्याने रविवारी (दि. १) रोहा शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाला नागरिक आणि श्रीसदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या अभियानांतर्गत रोहा नगरपालिकेच्या हद्दीतील सरकारी कार्यालय परिसर, शहरातील प्रमुख रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता



### ३५ टन कचऱ्याचे संकलन



करण्यात आली. शहरातील एकूण १२ प्रभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून प्रमुख रस्ते, बसस्थानक आणि रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छ करण्यात आला.

स्वच्छता मोहिमेत एकूण १११८ श्रीसदस्य व स्वयंसेवक सहभागी झाले होते तसेच रोह्याचे नगराध्यक्ष, पदाधिकारी व कर्मचारी यांचीही उपस्थिती लाभली. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हे अभियान उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

या स्वच्छता अभियानादरम्यान सुमारे ३५ टन कचरा संकलित करून डंपिंग ग्राउंड येथे पाठविण्यात आला. सकाळी ६ ते ११ या वेळेत श्रीसदस्यांनी एकत्रितपणे परिश्रम घेऊन संपूर्ण मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली.

या उपक्रमामुळे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहचला असून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून देण्यात आले आहे.

# खोपोली नगरपालिकेचा २३७ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत २०२६-२७ अंदाजपत्रकीय आर्थिक वर्षासाठी तब्बल २३७ कोटींचा घवघवीत अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यात पायाभूत सुविधा व भरीव विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी दिली.



अर्थसंकल्प एकूण २३७ कोटी ५६ लाख ४२ हजारांचा आहे. यात महसुली उत्पादनात मालमत्ता कर, पाणीपट्टीसह अन्य कर असून विकासकामांमध्ये भुयारी गटार, वाढीव पाणीपुरवठा योजना, रस्ते, उद्याने, गटारे व शहर सुशोभीकरण तसेच सामाजिक सभागृहासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. खोपोलीच्या विकासाला गती व नागरिकांच्या अपेक्षा पूर्णत्वास आणण्यासाठी अर्थसंकल्पात भरघोस तरतुदी करण्यात आल्या असल्याचे नगराध्यक्ष शेंडे यांनी सांगितले.

याच सभेत भाजीपाला मार्केट संकुल नव्याने बांधणे, शहरातील रस्त्यांची कामे, विविध प्रभागातील सामाजिक सभागृह निर्मितीच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली. सभेला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, सभापती व नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते.



# रेवदंडा बायपास रस्त्यावर कुत्र्यांचा उपद्रव; पायी प्रवास धोक्याचा!

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बायपास रस्त्यावर कुत्र्यांचा उपद्रव फारच वाढला असून येथून पायी प्रवास करणे धोक्याचे बनले आहे.

रेवदंडा बायपासला कचऱ्याचे डंपिग ग्राउंड सलग रस्त्यावर अनेक ठिकाणी ग्रामस्थांच्या हलगर्जीने तयार झाले आहेत. या बायपास रस्तालगत ग्रामस्थांनी कचरा टाकून केलेल्या डंपिग ग्राउंडने येथे कुत्रांचा वावर वाढला आहे. या डंपिग ग्रांउडच्या कचऱ्यामध्ये अनेक प्रकारची घाण, बॉयलर कोंबडीचे अवयव आदी प्रकारचा कचरा असल्याने येथे परिसरातील



असंख्य कुत्री जमा होतात, शिवाय या कुत्र्यांनी परिसर वाटून घेतल्याने एखादा अनोळखी कुत्रा येथे आल्यावर वारंवार कुत्र्यांचे एकमेकांवरील हल्ले सुरू असतात. एक प्रकारे गँगवॉर नित्याने सुरू असतो.

येथील रस्त्याला कुत्र्यांचे अनेक ग्रुप असल्याने येथून प्रवास करत असलेल्या दोन चाकी, चारचाकी वाहनांच्या पाठीमागे कुत्री भुंकत धावत असतात, तर पायी चालत जात असतानाही कुत्री अंगावर येत असल्याने धोकेदायक आहेत. येथून एकट्या-दुकट्याने पायी प्रवास करणे जिकीरीचे बनले आहे. संबंधितांनी त्वरित रेवदंडा बायपासवरील कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

# मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त राठोड विद्यालयात मराठी भाषेची पालखी, भाषा दुर्ग व अन्य कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात मराठी राजभाषा दिन अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालय परिसरात मराठी भाषेचा गौरव आणि अभिमान यांचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांनी साकारलेली मराठी राजभाषा दुर्ग ही संकल्पना. या दुर्गाच्या माध्यमातून मराठी भाषेची परंपरा, इतिहास आणि समृद्ध साहित्यविश्व यांचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले तसेच मराठीतील विविध साहित्यप्रकारांचे



ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेख अशा विविध साहित्यप्रकारांची माहिती विद्यार्थ्यांनी सुंदर पद्धतीने मांडली. अनेक नामवंत मराठी लेखक व कवी यांची माहिती फलकांच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा जागर करत विविध देशभक्तीपर आणि संस्कृतीप्रधान गीतांचे सादरीकरण केले. पारंपरिक व आधुनिक नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. तसेच कविता गायन आणि काव्यवाचनातून मराठी भाषेची गोडी आणि अभिव्यक्तीची ताकद अनुभवायला मिळाली. कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली मराठी भाषेची पालखी. लेझीम पथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण नृत्य करत पालखी मिरवणूक काढली. या अनोख्या उपक्रमामुळे संपूर्ण विद्यालय परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. हा संपूर्ण कार्यक्रम विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक अजित शेडगे यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आला. सांस्कृतिक प्रमुख डॉ. शारदा निवाते, शिल्पा पालकर यांचे सहाय्य लाभले.

मराठी भाषा गौरव दिन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील यांनी विद्यालयाचे, विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास पालकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी राजभाषा दिनाचा हा उत्सव विद्यार्थ्यांच्या मनात भाषाप्रेमाची ज्योत प्रज्वलित करणारा ठरला.

# नागोठण्यात शांतता समितीची बैठक

## सण-उत्सव उत्साहात, पण शिस्तीत साजरे करा -सपोनि सचिन कुलकर्णी

**नागोठणे : प्रतिनिधी**

होळी, धुलिवंदन, शिवजयंती उत्सव, रंगपंचमी व रमजान ईद आदी सण खेळीमेळीच्या आनंदी वातावरणात व शांततेत पार पाडा. आपण सर्वजण एक असून भाईचाऱ्याने राहत असल्याने तो टिकविणे आपल्याच हातात आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सहकार्य करून तुम्हीच आमचे नाक, कान, डोळे बनून येणारा होळी व इतर सण सर्वांनी मिळून शिस्तीचे पालन करून, नियमांचे उल्लंघन न करता व कायदा हातात न घेता आनंदाने साजरे करा, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी नागरिकांना केले.

आगामी येणारे सण, उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने नागोठणे पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. २८) सकाळी शांतता समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, महिला दक्षता सदस्य, व्यापारी, पत्रकार, पोलीस पाटील, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळ



अध्यक्ष यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना स.पो.न. कुलकर्णी बोलत होते.

पोलीस उपनिरीक्षक गोटीराम पावरा, हे.कॉ. अथर्व पाटील, शिपाई स्वप्नील भालेराव, नागोठणे शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष इम्रान पानसरे, अकबर पठाण, हरेश धामणे, सलीम सत्तार, विभागातील पोलीस पाटील व नागरिक हेही हजार होते.

सपोनि कुलकर्णी मार्गदर्शन करताना म्हणाले की, होळी ज्या जागेवर लावायची आहे त्यावरून वाद करू नका. वाद असतील तर आधी कल्पना द्या. सण, उत्सवामध्ये डिजे न वाजविता पारंपरिक वाद्ये वाजविताना दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेऊन वाद्य वाजवण्यासाठी दिलेल्या वेळेचे बंधन पाळा, महिलावर्गाने बसमधूनप्रवास करताना आपल्या दागिन्यांची काळजी घ्यावी व सजग रहावे तसेच गर्दीच्या ठिकाणी व बाजारात दागिने घालून एकट्या महिलेने जाऊ नये. पोलीस व प्रशासनाने लावलेल्या सर्व निर्बंधाचे पालन करा, मुंबईकर मंडळी सणासाठी गावी येत असल्याने जुन्या विषयावरून वाद करू नका. सणांमध्ये दारू व इतर अमली पदार्थांचे सेवन करून दुसऱ्याला त्रास होईल असे कृत्य करू नका. तसे केल्यास आम्हाला कडक कारवाई करावी लागेल, असा इशाराही कुलकर्णी यांनी दिला.

सोशल मीडियावर कोणताही आक्षेपार्ह व वादग्रस्त मेसेज टाकू नका, आलेल्या कोणत्याही पोस्टची खात्री करून, वाचून त्याचे अवलोकन करा. नंतरच ती पोस्ट लाईक व शेअर करा, असे कुलकर्णी म्हणाले. या बैठकीत उपनिरीक्षक गोटीराम पावरा व हवालदार अथर्व पाटील यांनीही आवश्यक त्या सूचना केल्या.

# होळी सणासाठी चाकरमानी चालले गावाला...

## पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे महामार्ग पोलिसांचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणातील एक पारंपरिक सण म्हणून ओळखला जाणारी होळी एका दिवसावर येऊन ठेपली आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणासाठी मुंबई, पुणे, ठाणे तसेच गुजरातमधील सुरत येथून कोकणात परतणाऱ्या कोकणवासीयांची मोठी गर्दी होत आहे. शनिवार, रविवार, सुट्टी, तर सोमवारी कलेक्टर घोषित सुट्टी आणि मंगळवारी धुलिवंदन अशी सलग चार दिवसांची सलग सुट्टी आल्याने कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. विशेषत: मुंबई-गोवा या प्रमुख महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

मुंबईहून कोकणात प्रवेश करताना इंदापूर व माणगाव ही बाजारपेठ प्रवेशद्वार म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी महामार्गाच्या बायपासचे काम अद्याप अपूर्ण असल्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी काळात वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागतोय. कोकणवासीय नागरिकांना आपल्या आराध्य दैवताचे वेळेवर दर्शन घेता यावे यासाठी वाहन चालक, मालक यांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, जेणेकरून सर्वांनाच आपापल्या गावी वेळेत पोहचता येईल. या प्रवासात काही अडचण आल्यास प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत महामार्गावर बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संबंधित पोलिसांची आपणाला मदत होऊ शकते. प्रवासादरम्यान सर्वांनी संयम बाळगून शिस्तीने प्रवास करावा, असे आवाहन रायगड पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

माणगाव तालुक्याच्या हद्दीत असणाऱ्या भुवन ते वडपाले, टेमपाले हद्दीपर्यंत महामार्ग वाहतूक शाखेचे २२ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय माणगाव येथील १० वाहतूक पोलीस, १२ होमगार्ड, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक व दोन पीएसआय अधिकारीवर्ग असा एकूण मजबूत बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी चौकाचौकात नियंत्रण ठेवले जात असून गरज भासल्यास वाहतूक वळविण्याची तयारीही ठेवण्यात आली आहे.

कोकण व तळकोकणात जाणाऱ्या स्थानिकांसोबतच पर्यटकांचीही मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. समुद्रकिनारे, गावदेवतेचे उत्सव आणि पारंपरिक होळी सोहळे अनुभवण्यासाठी बाहेरून येणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे महामार्गावरील ताण आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी नागरिकांना केले आहे.

मुंबई दिशेकडून येणाऱ्या प्रवाशांनी खोपोलीमार्गे पाली, निजामपूर, पाचाड, महाड असा मार्ग स्वीकारल्यास मुख्य महामार्गावरील ताण कमी होऊ शकतो तसेच इंदापूरपासून भाले, निजामपूर, पाचाड, महाड असा मार्गही सोयीचा ठरू शकतो. कोलाडमार्गे पहूर, भाले, निजामपूर, पाचाड, महाड,


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, **मौजे- मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड** येथील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं/ गट.नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| वालक्या काथोड पालकर | १९ | २ | ०-१५-४०<br>०-०२-०<br>०-१७-४० | ११.५० |
| | ३५ | ० | ०-०१-००<br>०-०२-००<br>०-०३-०० | ०.६ |
| | ७६ | ४ | ०-०५-१०<br>०-०१-५०<br>०-०६-६० | ०.१२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु. साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारवा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.


**दिनांक : ०१/०३/२०२६**

**सही/-**
**ॲड. सचिन बी, कोंडीलकर,**
**शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स, जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.**
**मो. ९८३३ ३०६३६१.**


# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**


अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान उत्सव २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर सी. व्ही. रमण यांच्या कार्याचे व रमण परिणामाचे स्मरण करण्यात आले.



या निमित्ताने महाविद्यालयात आंतरशाखीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, प्राणिशास्त्र आणि संगणकशास्त्र विभागांतील एकूण १०९ विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प, मॉडेल्स, चार्ट्स, प्रात्यक्षिके व डिजिटल सादरीकरणे सादर केली.

या प्रदर्शनाला मुख्याध्यापक वसीम सातारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व विज्ञान शिक्षकांनी भेट दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. अमानखान पठाण, विज्ञान विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# तटकरे कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. हा दिवस ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो.

मराठी विभागप्रमुख डॉ. राजेंद्र आचार्य यांनी प्रास्ताविकामध्ये मराठी भाषेचे वैभव, तिची समृद्ध साहित्यपरंपरा आणि जागतिक स्तरावर वाढत असलेले महत्त्व यांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना मातृभाषेच्या जतनासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.बी.एम. खामकर यांनी मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपल्या संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक असल्याचे नमूद केले. भाषा टिकली तर संस्कृती टिकते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी लेखन, वाचन आणि संवाद अधिक आत्मीयतेने जोपासण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी भाषणांमधून मराठी भाषेचा इतिहास, वर्तमानातील स्थान आणि भविष्यकालीन संधी यावर विचारमंथन झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा उपाध्ये हिने केले, तर आभार प्रा. वृषाली सालस्कर यांनी मानले.

# विजयानंतरही पाकिस्तान वर्ल्डकपमधून 'आऊट'

## ■ सरस धावगतीच्या जोरावर न्यूझीलंड उपांत्य फेरीत




**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्ध अगदी शेवटच्या चेंडूपर्यंत अटीतटीने लढवल्या गेलेल्या सामन्यात पाच धावांनी निसटता विजय मिळवल्यानंतरही पाकिस्तानचे टी-२० विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले. या निकालासह सुपर-८ फेरीतील ग्रुप- २मधून सरस नेट रनरेटच्या जोरावर न्यूझीलंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

साहिबजादा फरहान (१००) आणि फखर झमानच्या (८४) झंझावाती फलंदाजीनंतर पाकिस्तानने ८ बाद २१२ धावांचा डोंगर उभा केला. त्यानंतर उपांत्य फेरीचे तिकीट मिळवण्यासाठी पाकिस्तानला श्रीलंकेला १४७ किंवा त्यापेक्षा कमी धावात रोखणे अनिवार्य होते. तसे झाले असते तरच त्यांना न्यूझीलंडचा नेट रनरेट ओलांडता आला असता, मात्र श्रीलंकेने ही धावसंख्या तर सहज पार केलीच. शिवाय विजय मिळवण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत आटोकाट प्रयत्न केले. अंतिम क्षणी त्यांना निसटत्या पराभवाचा सामना करावा लागला असला तरी लंकेने पाकचे उपांत्य फेरी गाठण्याचे मनसुबे मात्र यामुळे पार धुळीस मिळवले.

सलामीवीर साहिबजादा फरहानचे स्पर्धेतील दुसरे शतक आणि फखर झमानच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर पाकिस्तानने २१२ धावांचा डोंगर उभा केला. पाकिस्तानच्या सलामीवीरांनी शनिवारी या निर्णायक लढतीत श्रीलंकन गोलंदाजीच्या अक्षरशः चिंधड्या उडवल्या. फरहान आणि फखर या जोडीने पहिल्या विकेटसाठी १७६ धावांची विक्रमी भागीदारी रचली. फरहानने यादरम्यान एकाच टी-२० विश्वचषकात सर्वाधिक धावांचा विराट कोहलीचा विक्रम मोडीत काढला. कोहलीने २०१४मध्ये ३१९ धावा फटकावल्या होत्या. यंदा फरहानने ३८३ धावा कुटल्या.

डावखुरा स्पीडस्टार शाहिन शाह आफ्रिदीच्या डावातील शेवटच्या षटकात विजयासाठी २८ धावांची आवश्यकता असताना दासून शनाकाने तब्बल २२ धावा फटकावत एकच खळबळ उडवून दिली, मात्र शेवटच्या दोन चेंडूंत सहा धावा जमवता न आल्याने त्याच्यासह लंकेचीही निराशा झाली. शनाकाने या षटकात खेचलेले एक्स्ट्रा कव्हर, डीप स्क्वेअर लेग, कव्हर्सकडील तीन षटकार व मिसहिटचा एक चौकार लक्षवेधी ठरला.

## रणजी ट्रॉफी विजेत्या जम्मू काश्मीर संघाला मुख्यमंत्र्यांकडून बक्षीस

**हुबळी** : जम्मू काश्मीरने रणजी ट्रॉफी जिंकल्यानंतर या केंद्रशासित राज्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले आणि राज्य सरकारकडून रोख रकमेचे बक्षीस जाहीर केले आहे. दोन कोटींचे इनाम खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला देण्यात येणार आहे.

हुबळी येथे झालेल्या रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात जम्मू काश्मीरने बलाढ्य कर्नाटकचा पराभव करत इतिहास रचला. त्यांनी आपली पहिलीवहिली रणजी ट्रॉफी जिंकली. आपल्या संघाचा हा ऐतिहासिक विजय जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मैदानावर उपस्थित राहून आपल्या डोळ्याने पाहिला. यानंतर मुख्यमंत्री कार्यालयाने एक्सवर पोस्ट केले की, आपल्या मुलांनी रणजी ट्रॉफी उंचावली, त्याबद्दल मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी त्यांना दोन कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. याचबरोबर हे खेळाडू नुकत्याच तयार केलेल्या खेळाडूंसाठीच्या नियमानुसार सरकारी नोकरीसाठीही पात्र असतील.

# पिंच्याक सिलॅट वूमन लीगमध्ये महाराष्ट्र चॅम्पियन

## रायगडच्या पालीतील खेळाडूंचाही समावेश




**पाली : प्रतिनिधी**

स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या मान्यतेने दिव दमण दादरा नगर हवेली येथे खेलो इंडिया अस्मिता पिंच्याक सिलॅट झोनल लीग स्पर्धेचे आयोजन सब ज्युनियर, ज्युनियर, सीनियर वयोगटातील मुलींसाठी करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र संघातून १४४ खेळाडूंनी सहभाग घेऊन १२ सुवर्ण, १२ रौप्य, १७ कांस्य अशी एकूण ४१ पदके जिंकून चॅम्पियनशिप चषक पटकावला.

स्पर्धेत महाराष्ट्र, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या राज्यातील ६३८ मुली सहभागी झाल्या. स्पर्धेत दुसऱ्या स्थानी दीव दमण संघ तसेच तिसऱ्या स्थानी मध्य प्रदेशचा संघ राहिला. विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य, कांस्यपदकासाठी अनुक्रमे आठ, सहा, चार हजार रुपये कॅश प्राईस देऊन स्पोर्ट अॅथॉरिटी ऑफ इंडियाकडून गौरविण्यात आले.

यशस्वी खेळाडूंचे इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे किशोर येवले यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र संघासाठी प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक नागेश बनसोडे, अमोल कदम, आकाश तिजारे, अरविंद शिर्के, आदित्य केंजळे, नागेश काळभोर, आकाश धबडगे, स्वेत्तम बुगावार, योगेश पानपाटील यांनी जबाबदारी पार पाडली. महाराष्ट्राच्या संघात रायगड जिल्ह्यातील पाली येथील खेळाडूंचाही सहभाग होता. सर्वांचे यशाबद्दल कौतुक होत आहे.

# रांजणखार येथे कोकण विभागीय शूटिंग बॉल स्पर्धा



## अलिबाग खारेपाटातील खेळाडूंसाठी स्टेडियम उभारणार -दिलीप भोईर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथे फ्रेंड्स ग्रुप संघ, आमदार महेंद्र दळवी, जि.प. सदस्य मानसी दळवी आयोजित आणि जि.प. सदस्य दिलीप भोईर पुरस्कृत कोकण विभागीय शूटिंग बॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी बोलताना भोईर यांनी खारेपाटातील तळागाळातील खेळाडूंच्या उन्नतीसाठी भव्य स्टेडियम उभारू, असे सांगितले.

शिवसेना पदाधिकारी डॉ. जगन्नाथ पाटील, सरपंच उदय म्हात्रे पंचायत समिती सदस्य भाग्यता पाटील, युवा नेते विशाल जुईकर, इतर पदाधिकारी तसेच फ्रेंड्स ग्रुप संघातील खेळाडू स्वप्नील पाटील, योगेंद्र पाटील, समीर म्हात्रे, प्रतीक म्हात्रे, अनिकेत म्हात्रे, मनोज पाटील व मित्र मंडळ रांजणखारतर्फे दिलीप भोईर यांचा सन्मान करण्यात आला, तर त्यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रात जिल्हा राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कार्य केलेल्या खेळाडूंना गौरविण्यात आले.

# स्व. सामनाधिकारी चषकाचे भैरवनाथ मंडळ, गुड मॉर्निंग स्पोर्ट्स मानकरी





**मुंबई : प्रतिनिधी**

स्पर्श फाउंडेशनने आयोजित केलेल्या तृतीय श्रेणी पुरुषात भैरवनाथ मंडळाने विजेतेपद पटकाविले. १४ वर्षाखालील गटात हा मान गुड मॉर्निंग स्पोर्ट्स संघाने मिळविला.

लोअर परेल येथील मॅरेथान मैदानात झालेल्या तृतीय श्रेणी पुरुषांच्या अंतिम सामन्यात भैरवनाथ मंडळाने श्री दत्त मंडळावर ३२-६ अशी सहज मात करीत रोख रक्कम व स्व. सामनाधिकारी चषकावर नाव कोरले. आक्रमक खेळ करून लोण देत भैरवनाथने विश्रांतीला १५-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या डावात त्याच तडफने खेळ करीत श्री दत्तला पुरते नामोहरण केले. तन्वय कदम, सतीश जाधव यांच्या चढाई पकडीच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. श्री दत्तचा शिवम रायभान बरा खेळला.

१४ वर्षाखालील गटाच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने सार्थ बागडे, शिव शर्मा, श्रेयस यादव यांच्या चतुरस्त्र खेळाने श्री संस्कृती मंडळावर ४७-२८ अशी मात करीत स्व. सामनाधिकारी चषक मिळविला. संस्कृतीचा सचिन तिवारीने एकाकी लढत दिली.

भैरनाथचा तन्मय कदम तृतीय श्रेणी गटात सर्वोत्तम खेळाडू ठरला. सतीश जाधव (भैरवनाथ), शिवम रायभान (श्री दत्त) स्पर्धेतील उत्कृष्ट पकड व चढाईचे खेळाडू ठरले. या सर्वांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. १४ वर्षाखालील गटात गुड मॉर्निंगचा सार्थक बागडे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. शिव शर्मा (गुड मॉर्निंग), सचिन तिवारी (संस्कृती) स्पर्धेतील उत्कृष्ट पकड व चढाईचे खेळाडू ठरले. सर्वांना चषक देऊन गौरविण्यात आले.

# अकिल नबीची कामगिरी पाहून 'दादा' प्रभावित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी सध्या आपल्या धारदार गोलंदाजीने भारतीय संघाचा दरवाजा ठोठावत आहे. नबीची उत्कृष्ट कामगिरी पाहून बीसीसीआयचे माजी अध्यक्ष आणि माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी नबीला भारतीय संघात संधी देण्याची हीच योग्य वेळ असल्याचे म्हटले आहे.

रणजी चषक स्पर्धेत कर्नाटकविरुद्धच्या अंतिम सामन्यात आकिब नबीने भेदक मारा करत ५४ धावांत पाच बळी टिपले. त्याच्या या कामगिरीमुळे जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात मोठी आघाडी मिळवली आणि सरतेशेवटी ऐतिहासिक विजयाला गवसणी घातली. हुबळीच्या ज्या खेळपट्टीवर कर्नाटकचे गोलंदाज हतबल दिसले आणि त्यांनी ५८४ धावा मोजल्या, त्याच खेळपट्टीवर नबीने चेंडू दोन्ही बाजूंना वळवून फलंदाजांना नाचवले. त्याने के.एल. राहुल, मयांक अग्रवाल आणि करुण नायर यांसारख्या कसोटीपटूंना तंबूचा रस्ता दाखवला.

नबीच्या कामगिरीने प्रभावित होऊन सौरव गांगुली यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, कठोर परिश्रम आणि जिद्द काय करू शकते, हे जम्मू-काश्मीरने जगाला दाखवून दिले आहे. या संघाने आपल्या प्रदेशाचा मान वाढवला आहे. कठीण परिस्थितीच कणखर माणसे घडवते. आकिब नबी आता भारतीय संघाच्या जर्सीच्या दिशेने वाटचाल करत आहे. आगामी उन्हाळ्यात इंग्लंडचा दौराही त्याच्यासाठी सर्वोत्तम सुरुवात ठरेल.

गांगुली यांनी पोस्टमध्ये अजित आगरकर आणि बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनाही टॅग केले आहे. जुलै २०२६मध्ये भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यात मर्यादित षटकांची मालिका खेळणार आहे. या वातावरणात आकिबची स्विंग गोलंदाजी प्रभावी ठरेल, असा विश्वास गांगुलींनी व्यक्त केला आहे.

### आयपीएलमध्येही संधी

आकिबच्या सातत्यपूर्ण कामगिरीची दखल आयपीएल लिलावातही घेण्यात आली आहे. आगामी हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्सने त्याला ८.४० कोटी रुपयांची मोठी बोली लावून आपल्या ताफ्यात सामील केले आहे. आता रणजीनंतर आयपीएलच्या मैदानातही नबीच्या कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष असणार आहे.

# आता सेमी फायनल, फायनल भारतातच होणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीलंकेपाठोपाठ पाकिस्तानचा संघ टी-२० वर्ल्डकप स्पर्धेबाहेर झाल्यावर आता सेमी फायलचे ठिकाणही बदलले आहे. आता दोन्ही सेमी फायनल भारतात होतील.

सुपर-८मधील पहिल्या गटातून इंग्लंड आणि न्यूझीलंड हे दोन संघ सेमी फायनलसाठी पात्र ठरले आहेत. दुसऱ्या गटातून दक्षिण आफ्रिकेचा संघ पात्र ठरला असून भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील एक संघ चौथ्या सेमी फायनलिस्टच्या रूपात आपली पात्रता सिद्ध करेल हे निश्चित झाले.

यंदाच्या हंगामातील ५ मार्चला रंगणारा दुसरा सेमी फायनल सामना हा मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रंगणार हे आधीच ठरले होते, पण ४ मार्चला पहिल्या सेमी फायनलचे ठिकाण हे श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्या सेमी फायनल पात्रतेच्या निकषावर अवलंबून होते. या दोन्ही संघातील एक संघ जरी सेमी फायनलसाठी पात्र ठरला असता तर पहिली सेमी फायनल कोलंबोच्या स्टेडियमवर खेळवण्यात येणार होती, पण हे दोन्ही संघ स्पर्धेबाहेर पडल्यामुळे पहिल्या सेमी फायलमधील लढत ही ठरलेल्या तारखेनुसार कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात खेळवण्यात येणार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले.

फायनलच्या ठिकाणासंदर्भात एक समीकरण होते. जर पाकिस्तानचा संघ फायनलसाठी पात्र ठरला, तर फायनल लढत कोलंबोच्या मैदानात खेळवण्यात येणार होती, मात्र आता हा सामनाही ठरल्याप्रमाणे अहमदाबादच्या मैदानात होणार हेही सुनिश्चित झाले आहे.

- **पहिली सेमी फायनल :** ४ मार्च-ईडन गार्डन्स, कोलकाता
- **दुसरी सेमी फायनल :** ५ मार्च-वानखेडे स्टेडियम, मुंबई
- **फायनल :** ८ मार्च-नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद





**खारघर : 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमाला रविवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उपस्थित राहून अभिवादन आणि मार्गदर्शन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विविध खात्यांचे मंत्री, इतर मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी विमानतळावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्वागत केले.**













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com